
सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १३९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २५ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## आणीबाणीला आज ५० वर्षे पूर्ण
## पंतप्रधान मोदींचा काँग्रेसवर हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नवी दिल्ली**

भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी जाहीर केली होती. इंदिरा गांधी यांनी घेतलेल्या या निर्णयाला आज ५० वर्ष पूर्ण झाले. याच पार्श्वभूमीवर आणीबाणीच्या दिवसांची आठवण करून देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला. इतिहासातील सर्वात काळ्या अध्यायांपैकी एक असलेल्या आणीबाणीला आज पन्नास वर्षे पूर्ण झाली, हा तोच काळ आहे, जेव्हा काँग्रेसने लोकशाहीला ओलीस ठेवले, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

कोणताही भारतीय आणीबाणीचा काळ विसरू शकत नाही. त्यावेळी संसदेचा आवाज दाबण्यात आला आणि न्यायालयांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला. ४२ वी घटनादुरुस्ती ही त्यांच्या कृतींचे एक उत्तम उदाहरण आहे, असेही नरेंद्र मोदी म्हणाले.



आणीबाणीविरुद्धच्या लढाईत ठाम राहिलेल्या प्रत्येकाला आम्ही सलाम करतो. त्यावेळी वेगवेगळ्या विचारसरणीच्या लोकांनी एकत्र येऊन एकमेकांसोबत काम केले. भारताच्या लोकशाही रचनेचे रक्षण करणे, हे त्यांचे ध्येय होते. त्यांच्या सामूहिक संघर्षामुळेच तत्कालीन काँग्रेस सरकारला लोकशाही पुनर्संचयित करावी लागली आणि निवडणुका घ्याव्या लागल्या, ज्यात त्यांना मोठ्या पराभवाला सामोरे जावा लागले, असेही मोदी म्हणाले.

पुढे मोदी म्हणाले की, जेव्हा आणीबाणी लागू करण्यात आली तेव्हा मी संघाचा एक तरुण प्रचारक होतो. आणीबाणीविरोधी चळवळीदरम्यान राजकीय क्षेत्रातील सर्व लोकांकडून मला खूप काही शिकायला मिळाले. ब्लूक्राफ्ट डिजिटल फाउंडेशनने त्यातील काही अनुभव पुस्तकाच्या माध्यमातून लोकांसमोर मांडला आहे, याचा मला आनंद आहे. या पुस्तकाची प्रस्तावना एचडी देवेगौडा यांनी लिहिली आहे, जे स्वत: आणीबाणीविरोधी चळवळीचा चेहरा होते.

आणीबाणीच्या त्या काळ्या दिवसांची आठवण असलेल्या किंवा ज्यांच्या कुटुंबांनी त्या काळात त्रास सहन केला आहे, अशा सर्वांना मी सोशल मीडियावर त्यांचे अनुभव शेअर करण्याचे आवाहन करतो. यामुळे १९७५ ते १९७७ या लज्जास्पद काळाबद्दल तरुणांमध्ये जागरूकता निर्माण होईल, असे मोदींनी म्हटले आहे. तसेच आपल्या संविधानात नमूद केलेल्या तत्त्वांना बळकटी देण्यासाठी आणि विकसित भारताचे आपले स्वप्न साकार करण्यासाठी आपण एकत्र काम करत आहोत. आपण प्रगतीच्या नवीन उंची गाठू आणि गरीब आणि वंचितांची स्वप्ने पूर्ण करू, असेही ते म्हणाले.

## आता कृषी विभागाच्या योजनेतील गैरव्यवहारांच्या चौकशीसाठी समिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५पुणे**

कृषी विभागातील विविध योजनांमधील गैरव्यवहार तसेच शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बेकायदा सुरू केलेल्या कृषी निविष्ठा आणि उत्पादक कंपन्या तसेच विक्री केंद्रांसंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्याने आणि काही आमदारांनी यासंदर्भात विधानसभेत प्रश्न उपस्थित केल्यानंतर या सर्व प्रकाराची चौकशी करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे. प्रशासकीय सेवेतून निवृत्त झालेले डॉ. उमाकांत दांगट यांच्याकडून ही चौकशी होणार आहे.



कृषी विभागातील विविध योजनांमधील गैरव्यवहार तसेच शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बेकायदा सुरू केलेल्या कृषी निविष्ठा, उत्पादक कंपन्या आणि विक्री केंद्राबाबत आक्षेप नोंदविण्यात आले होते. बीड जिल्ह्यातील केज मतदारसंघाचे भारतीय जनता पक्षाचे आमदार सुरेश धस यांनीही त्यासंदर्भात तक्रार केली होती. या गैरव्यवहारासंदर्भातील मुद्दा त्यांनी विधानसभेतही उपस्थित केला होता. या सर्व प्रकाराची चौकशी समकक्ष अधिकाऱ्यांकडून करण्याचे विचाराधीन होते. मात्र तक्रारींमधील मुद्द्यांची व्याप्ती मोठी असल्याने, कार्यरत वरिष्ठ अधिकाऱ्यांना चौकशीसाठी नियुक्त केल्यास नियमित कामकाजावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता होती.तक्रारींचे स्वरूप, गांभीर्य पहाता या सर्व प्रकाराची चौकशी त्वरित करण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवेतून निवृत्त झालेले डॉ. उमाकांत दांगट यांच्याकडे चौकशीचे कामकाज वर्ग करण्याची विनंती कृषी आयुक्तांकडून करण्यात आली होती. त्यानुसार डॉ. दांगट यांची नियुक्ती करण्यास राज्याच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्सव्यवसाय विभागाने मंजुरी दिली असून त्याबाबतचा आदेश मंगळवारी जाहीर केला.

## इलेक्ट्रिक वाहनांची टोलमाफी फक्त कागदावरच?
### जीआर काढूनही समृद्धीवर टोल वसुली सुरूच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने २३ मे रोजी शासन आदेश काढला होता. राज्यातील समृद्धी महामार्ग, अटल सेतू आणि मुंबई पुणे एक्सप्रेस वे या महामार्गावर सर्व इलेक्ट्रिक वाहनांना शंभर टक्के टोल माफीचा निर्णय घेतला होता. ३० दिवसांच्या आत संबंधित विभागाने यावर नियमावली करून अंमलबजावणी करणं गरजेचं होतं. मात्र ३० दिवसांचा कालावधी उलटला तरी त्याची अंमलबजावणी सुरू झालेली नाही.

शासन आदेश निघाल्यानंतर इलेक्ट्रिक वाहन चालक समृद्धी महामार्गावर प्रवास करत आहेत. मात्र टोल नाक्यावर सूट दिली जातनाही. टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांना याबाबत विचारले असते वाद घातला जात आहे. टोल नाक्यावरील कर्मचारी आणि वाहन चालकांमध्ये हुज्जत होत असल्याच्या अनेक घटना घडत आहेत. शासनाची इलेक्ट्रिक वाहनांना टोल माफी फक्त कागदावरच आहे का? असा प्रश्न वाहनचालकांकडून उपस्थित करण्यात येत आहे.शासन आदेशानंतर अनेक इलेक्ट्रिक वाहनचालक समृद्धी महामार्गावर टोलमाफीच्या अपेक्षेने प्रवास करत आहेत. परंतु, टोल नाक्यांवर त्यांना कोणतीही सूट मिळत नाही. टोल कर्मचाऱ्यांना याबाबत विचारणा केल्यास वाद निर्माण होत असल्याच्या अनेक घटना समोर येत आहेत. वाहनचालक आणि कर्मचारी यांच्यात हुज्जत होण्याचे प्रकार घडत आहेत. यामुळे शासनाचा टोलमाफीचा निर्णय केवळ कागदावरच राहिल्याची टीका वाहनचालकांकडून होत आहे.



शासनाने मोठी घोषणा केली, पण प्रत्यक्षात काहीच होत नाही. टोल नाक्यावर कर्मचारी आदेशाबाबत अनभिज्ञ असतात, असे एका इलेक्ट्रिक वाहनचालकाने सांगितले. यामुळे इलेक्ट्रिक वाहनांच्या प्रोत्साहनासाठी घेतलेला निर्णय प्रभावी ठरण्यास अडथळे येत आहेत. संबंधित विभागाने तातडीने नियमावली तयार करून अंमलबजावणी करावी, अशी मागणी वाहनचालकांनी केली आहे. अन्यथा, हा निर्णय फक्त घोषणाबाजी ठरेल, असा इशारा वाहनचालकांनी दिला आहे.

## भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्लांनी रचला इतिहास
### Axiom-4 मोहीमेसाठी नासाच्या यानातून अवकाशात झेप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नवी दिल्ली**

भारताचे पहिले व्यावसायिक अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांनी आज (२५ जून) दुपारी १२.०१ वाजता इतिहास रचला आहे. शुभांशू शुक्ला यांनी नासाच्या (अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था) फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटरवरून 'ॲक्सिऑम-४' या अंतराळ मोहीमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या दिशेने उड्डाण केलं आहे. नासाचं फॉल्कन-९ हे यान अवकाशात झेपावलं आणि त्याबरोबर शुक्ला यांनी ऐतिहासिक कामगिरी केली.

### एका दिवसात १६ वेळा सूर्योदय व सूर्यास्त पाहणार

आंतरराष्ट्रीय अंतराळ केंद्राशी जोडण्यासाठी या यानाला २८ तास लागणार आहेत. तत्पूर्वी पुढील २४ तासांत हे यान १६ वेळा पृथ्वीला प्रदक्षिणा घालणार आहे. त्यामुळे एका दिवसांत हे अंतराळवीर १६ वेळा सूर्योदय व १६ वेळा सूर्यास्त पाहतील.



'ॲक्सिऑम-४' मोहिमेअंतर्गत अन्य तिघा अंतराळवीरांबरोबर शुक्ला यांनी आज अवकाशात उड्डाण केलं. फॉल्कन-९ या रॉकेटद्वारे त्यांनी अवकाशात उड्डाण केलं आहे. याआधी ३ एप्रिल १९८४ रोजी भारताचे अंतराळवीर राकेश शर्मा हे सोव्हिएत संघाच्या मदतीने अवकाश मोहीमेवर गेले होते. ४१ वर्षांनंतर एक भारतीय अंतराळवीर आज अवकाशात झेपावला आहे. शुभांशू शुक्ला हे मूळचे लखनौचे रहिवासी असून ते वायूदलात ग्रुप कॅप्टन या पदावर कार्यरत आहेत. १ वर्षाचं प्रशिक्षण व कठोर मेहनतीनंतर त्यांची नासाने या मोहीमेसाठी निवड केली आहे.

शुक्ला हे या मोहिमेचे सारथ्य करत असून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात ते १५ दिवस राहणार आहे. या काळात ते शून्य गुरुत्वाकर्षणात काही प्रयोग करणार आहेत. नासा व इस्रो (भारतीय अंतराळ संशोधन संशा) या दोन दिग्गज अंतराळ संशोधन संस्थांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम राबवली जात आहे. इस्रो व नासाने केलेल्या संयुक्त कराराअंतर्गत आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात अंतराळवीर पाठवण्याचं निश्चित करण्यात आलं आहे. या करारानंतरच्या पहिल्या मोहिमेअंतर्गत शुभांशू शुक्ला अवकाश प्रवास करत आहेत. त्यांची AXIOM-4 मोहिमेसाठी 'प्राइम अस्ट्रॉनॉट' (प्रमुख अंतराळवीर) म्हणून निवड करण्यात आली आहे.

शुभांशू शुक्ला व त्यांचे सहकारी अंतराळवीर फॉल्कन-९ या रॉकेटशी जोडलेल्या ड्रॅगन या मायक्रो रॉकेटद्वारे अंवकाशात प्रवास करणार आहेत. त्यामुळे शुक्ला यांचं यान अवकाशात स्थिरावल्यानंतर फॉल्कन-९ हे रॉकेट सुरक्षितपणे पृथ्वीवर परतलं आहे. पुढील २८ तासांत त्यांचं यान आंतरराष्ट्रीय अंतराळ केंद्राशी जोडलं जाईल. त्यानंतर आंतराळ केंद्राच्या दिशेने प्रवास सुरू केला जाईल.

## आता वर्षातून दोनदा होणार दहावीच्या बोर्डाची परीक्षा; सीबीएसई बोर्डाचा मोठा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नवी दिल्ली**

सीबीएसईने २०२६ पासून वर्षातून दोनदा १० वीच्या बोर्डाची परीक्षा घेण्यास मान्यता दिली आहे. परीक्षा नियंत्रक संयम भारद्वाज यांनी ही घोषणा केली आहे. त्यामुळे पुढच्या वर्षीपासून उइडए च्या १० वी बोर्डाच्या वर्षातून दोन वेळा परीक्षा घेतल्या जातील. पहिल्या टप्प्यात फ्रेब्रुवारी आणि दुसऱ्या टप्प्यात मे महिन्यात या परीक्षा होतील.

१० वीच्या बोर्डाच्या परीक्षेसाठी पहिल्या टप्प्यातील परीक्षेला हजर राहणे बंधनकारक आहे तर दुसऱ्या टप्प्यातील परीक्षा पर्याय म्हणून आहे. मुलांचे अंतरिम मूल्यांकन केवळ एकदाच केले जाणार आहे. सीबीएसई बोर्डाच्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना गुणपत्रिकेत सुधारणा करण्याची संधी मिळणार आहे. जर एखाद्या विद्यार्थ्याला पहिल्या टप्प्यातील परीक्षेत कमी मार्क मिळाले तर त्याला दुसऱ्या टप्प्यातील परीक्षेत चांगली कामगिरी करण्याची संधी आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्डाने १० वीच्या वर्गासाठी वर्षातून दोनदा परीक्षा आयोजित करण्यास मान्यता दिली आहे.

सीबीएसई ने हा निर्णय केंद्राचे नवीन शैक्षणिक धोरणाच्या शिफारशीवरून घेतला आहे. त्याचा हेतू मुलांवरील मानसिक दडपण आणि तणाव कमी करणे हा आहे. जेणेकरून मुलांना त्यांच्या चूका सुधारण्याची संधी मिळेल. विद्यार्थ्याच्या प्रतिभेचे पूर्ण मूल्यांकन एकाच परीक्षेद्वारे करता येत नाही असं बोर्डाचे मत बनले आहे.

## 'संविधान हत्या दिवस': पुढच्या पिढीला भारताचे लोकशाही आम्ही वाचवली, हे सांगावे लागणार; देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ मुंबई**

या देशात पन्नास वर्षांपूर्वी लोकशाहीला संपवण्याचा प्रयत्न झाला होता. स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी केवळ आणीबाणी लागू करून विरोधातील सर्व नेत्यांना तुरुंगात टाकले नव्हते तर तर भारतीय संविधानात देखील बदल केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानातील मुलभूत अधिकार माझ्यासाठी सर्वात महत्त्वपूर्ण असल्याचे म्हटले होते. मात्र तेच अधिकार इंदिरा गांधी यांनी संपवले होते. त्या जागेवर डायरेक्टिव्ह प्रिन्सिपलला जागा देण्यात आली होती. प्रधानमंत्री यांचे पदाला कोणत्याही न्यायालयाच्या कक्षेतून बाहेर काढण्यात आले होते, असा दावा देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. 'संविधान हत्या दिवस' निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

या वेळी फडणवीस यांनी इंदिरा गांधी यांनी घेतलेल्या या निर्णयावर टीका केली. ते म्हणाले की, इंदिरा गांधी यांनी पंतप्रधान पदाला अमर्याद अधिकार दिले होते. इतकेच नाही तर सर्वोच्च न्यायालयाला देखील संसदेच्या अंतर्गत आणण्याचा प्रयत्न संविधानाला बदलून करण्यात आला होता. भारतीय लोकशाहीला संपवण्याचे काम ५० वर्षांपूर्वी स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी केले होते, असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.



भारताच्या लोकशाही वाचवण्यासाठी लोकशाही संग्राम सेनानी लढले. यामध्ये अटल बिहारी वाजपेयी, जॉर्ज फर्नांडिस, मोरारजी देसाई, लालकृष्ण अडवाणी यांच्यासारख्या मोठ्या नेत्यांनी मिळून अशी लढाई लढली की, ज्यामुळे भारताचे संविधान आणि भारताची लोकशाही वाचली. त्यामुळे हा दिवस देशासाठी खूप महत्त्वपूर्ण आहे. आपल्या पुढच्या पिढीला भारताची लोकशाही आम्ही वाचवली, हे सांगावे लागणार आहे, असे देखील देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

**आणीबाणी : लोकशाहीच्या हत्येचा काळा अध्याय - फडणवीसांचा विशेष लेख**

जेव्हा काँग्रेस सरकारने आपल्या विरोधात चिघळणार्या राजकीय वातावरणावर आणीबाणीची शाल पांघरण्याचा प्रयत्न केला, अचानक एके रात्री देश झोपेत असताना लोकशाहीची हत्या केली. लोकशाही मूल्यांचा आणि सांविधानिक संस्थांच्या त्या भीषण संहाराचा आढावा घेणारा, लोकशाहीच्या रक्षणार्थ आणीबाणीविरोधात झुंजणाऱ्या सेनानींच्या गौरवाचे महत्व अधोरेखित करणारा माझा विशेष लेख... नक्की वाचा, असे आवाहन देखील देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. एका पोस्टच्या माध्यमातून त्यांनी लिहिलेला लेख वाचण्याचे आवाहन केले आहे.

## संपादकीय ......

# सैराट पाऊस..

पावसाचे धूमशान सध्या महाराष्ट्राच्या विशिष्ट भागात सुरू आहे, हे आपण आधी लक्षात घेतले पाहिजे. उदाहरणार्थ, या आठवड्यातील आणि गेल्या आठवड्यातील पावसाचे प्रमाण पाहता पाऊस फक्त शहरांमध्ये पडत आहे. म्हणजे, पुणे-मुंबईकडे पडत आहे. मराठवाड्यातील शेतकरी पेरण्या करून आभाळाकडे डोळे लावून बसला आहे. पावसाचे ढग येण्याऐवजी सूर्यप्रकाशाचे प्रखर किरण शेतीमध्ये पडत आहेत. जिथे पाहिजे तिथे तो पडत नाही आणि जिथे नको आहे तिथे नेमका तो पडत आहे. अशी परिस्थिती दरवर्षी असते. उदाहरणार्थ, मावळ आणि कोकण भागातील शेतकरी या काळामध्ये दरवर्षी भाताची लागवड करत असतात.

भात लागवड करण्यासाठी आधी त्यांची रोपे लावावी लागतात. अशी हिरवीगार दाट लावलेली रोपे एकदा थोडीशी मोठी झाली की, पाऊस सुरू असतानाच भाताची पेरणी केली जाते. यावर्षी मे महिन्यातच पावसाने सुरुवात केल्यामुळे बहुतांश लोकांकडे रोपे नाहीत आणि रोप नाही तर भात लावणार कसा आणि तांदूळ नाही आला, तर मग जगणार कसे, असा मोठा प्रश्नच येथील शेतकर्यांना पडला.

पावसाची तुलना लग्नाळू मुलींशी करण्याचा मोह होत आहे. महाराष्ट्राच्या तमाम भागातील लग्न करण्यासाठी उत्सुक असणार्या मुलींना स्थळ हे पुणे किंवा मुंबईचे पाहिजे असते. तसेच काहीसे पावसाच्या झाले आहे. पुणे आणि मुंबईमध्ये पावसाची संततधार आहे; मात्र तो ग्रामीण भागात पडायला तयार नाही. आजकाल मुलींनाही गावाकडचे शेतकर्याचे स्थळ असले, तर ते नकोच असते. शेतकरी असला की, कष्ट आले. शेतीचे उत्पन्न निश्चित नसते. त्यापेक्षा जेमतेम पगाराची नोकरी पुण्यात किंवा मुंबईत असेल, तर मुली लग्नाला तत्काळ तयार होत आहेत. मुंबई-पुण्यातील वरासोबत लग्न करण्याचा हा एक फायदा आहे की, किमान काही शिक्षण घेतलेली मुलगी असेल, तर ती पण काही ना काही तरी काम करून संसाराला हातभार लावू शकते. एकंदरीतच ग्रामीण भागातील पाणीटंचाई, कमी उपलब्ध असलेला रोजगार, शिवाय एकत्र कुटुंबातील राहणे या सर्व गोष्टींमुळे राजा-राणीचा सुखाचा संसार करायचे स्वप्न मुली शहरांमध्येच पाहू शकतात, खेड्यांमध्ये नाही.

पावसाचेही असेच काहीसे झाले आहे की काय, असे वाटते. पुणे, मुंबई भागामध्ये मुसळधार पाऊस संततधारेने कोसळत आहे आणि त्याच वेळेला विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये पावसाने मात्र ओढ दिलेली आहे. मराठवाड्यात कापूस किंवा सोयाबीन लावलेले शेतकरी हताश होऊन आभाळाकडे बघत आहेत आणि त्याच वेळेला अतिरिक्त पावसामुळे कोकणातील शेतकरी रोपांचे काय करायचे, या विवंचनेत आहेत. असा हा बेभरवशाचा सैराट पाऊस दरवर्षीच वाटेल तसा पडत असतो.यात किमान एक सुखाची बाब म्हणजे, मे महिन्याच्या अखेरीस जाणवणारी पाणीटंचाई मात्र यावर्षी जाणवली नाही. मे महिन्यातील पाऊस सर्वदूर पडला. त्यामुळे नदी, नाले वाहायला लागले. बोअरला पाणी आले. धरणे भरण्यास सुरुवात झाली. जसा पाऊस सर्वत्र पडला तसे टँकरवर अवलंबून राहण्याचे प्रमाणही कमी झाले.आता उरलेला पावसाळा कसा राहणार, याविषयी उत्सुकता आहे. किमान आताही जिथे पेरण्या झाल्या आहेत तिथे पाऊस पडला, तर पीक चांगले येऊ शकते. हा उर्वरित पावसाळा व्यवस्थित गेला, तर रब्बी पिकाचीही काळजी राहणार नाही जेणेकरून वर्षातून दोन पिके घेणार्या शेतकर्यांना मोठा दिलासा मिळू शकतो.

पर्जन्य देवता इतकी लहरी आहे की, या देवतेची प्रार्थना करण्याशिवाय आपण काहीही करू शकत नाही. उर्वरित पावसाळा नियमित, जसा पाहिजे तसा यावा यासाठी प्रार्थना करूयात. कारण, आपल्या हातात तेवढेच आहे.

# 'बीबीएफ' तंत्र आधुनिक शेतकऱ्यांची पेरणीची यशस्वी गुरुकिल्ली! वाचा सविस्तर

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

पाऊस कधी पडेल, कधी थांबेल याचा नेम नाही. हवामान बदललंय, मात्र, आपल्या शेतीचा भरवसा कायम ठेवायचा असेल, तर पेरणीची पद्धतही बदलावी लागेल.

पारंपरिक पद्धती आता मागे पडत आहेत आणि आधुनिक, हवामान-तरोताजा शेतीत बीबीएफ म्हणजेच रुंद वरंबा व सरी पद्धतीने पेरणी ही शेतकऱ्यांची नवी दिशा ठरते आहे.पाणी साचत नाही, खतांचा योग्य वापर होतो, उत्पादनात वाढ होते आणि जमिनीचा पोतही सुधारतो. अशा बहुपयोगी बीबीएफ तंत्रामुळे शेतकरी यशस्वी होतोय.

**शेतीतील यशाची गुरुकिल्ली**

परिस्थिती बदलते आहे, हवामानही अनिश्चित झाले आहे. अशा काळात शेतकऱ्यांनी शेतीसाठी योग्य पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे ठरते. 'बीबीएफ' म्हणजेच रुंद वरंबा आणि सरी पद्धतीने पेरणी ही अशीच एक आधुनिक व शाश्वत शेतीची दिशा दाखवणारी पद्धत आहे.

महाराष्ट्रातील अनेक शेतकरी आता पारंपरिक पद्धतीऐवजी बीबीएफचा वापर करत असून, उच्च उत्पादन व खर्चात बचत याचा अनुभव घेत आहेत.

**बीबीएफ पद्धती म्हणजे काय?**

* बीबीएफ म्हणजे रुंद वरंबा आणि सरी अशा पद्धतीने शेतात पेरणी करणे.

* या पद्धतीत: ४५ ते ६० सें.मी. अंतरावर रुंद वरंबा तयार केला जातो.

* बीबीएफ यंत्राच्या सहाय्याने बी, खत आणि आंतर मशागत एका वेळी केली जाते.

* वरंब्यांमधून पावसाचे पाणी निचरा होते, आणि मुळांना हवा मिळते.

या पद्धतीने शेतकऱ्यांना होणारे फायदे

* २०-२५% पर्यंत उत्पादनात वाढ

* पावसाचे पाणी साचत नाही, बियाण्यांची कुज टळते

* मुळांना हवा मिळते, जमिनीचा पोत सुधारतो

* कीड, तण आणि रोग नियंत्रण सुलभ

* खते योग्य प्रकारे मुरतात, कार्यक्षमता वाढते

* मशागत, फवारणी व आंतर मशागत सुलभ होते

* वेळ, मजुरी आणि खर्चात बचत

* बियाण्याच्या खर्चात बचत

* शेतातील ओलावा टिकतो, त्यामुळे दुष्काळातही फायदा

**कशासाठी योग्य?**

बीबीएफ पद्धती सोयाबीन, कापूस, मका, हरभरा, ज्वारी, बाजरी अशा अनेक पिकांसाठी अत्यंत उपयुक्त आहे.

शेतकऱ्यांनो, आजच बीबीएफचा स्वीकार करा!

शेती टिकवण्यासाठी, उत्पादन वाढवण्यासाठी आणि हवामान बदलाला तोंड देण्यासाठी बीबीएफ पद्धत ही काळाची गरज आहे. 'जमिनीचे आरोग्य, शेतकऱ्याचे समाधान' हाच या तंत्रज्ञानाचे उद्देश आहे.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष




शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




# गव्हाची पोळी की ज्वारीची भाकरी; आरोग्यासाठी काय आहे बेस्ट?

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

आपल्या रोजच्या जेवणात पोळी किंवा भाकरी असतेच हे पदार्थ आपल्या जेवणाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. पण, आपल्या तब्येतीसाठी आणि वजन कमी करण्यासाठी काय जास्त चांगले आहे, गव्हाची पोळी की ज्वारीची भाकरी? चला, हे एकदम सोप्या भाषेत समजून घेऊया.

**मऊ आणि चविष्ट गव्हाची पोळी**

आपल्याकडे बहुतेक घरांमध्ये गव्हाची पोळी रोज बनवली जाते. ती बनवायला सोपी, खायला मऊ आणि चवीला छान लागते. गव्हामध्ये 'ग्लूटेन' नावाचा एक घटक असतो, ज्यामुळे पोळी चांगली फुगते आणि मऊ राहते. गव्हाची पोळी खाल्ल्यावर शरीराला लगेच ताकद मिळते. कोणी खावी? ज्यांना पचनाचा त्रास नाही आणि ज्यांना मऊ पोळ्या आवडतात, त्यांच्यासाठी गहू चांगला आहे.

**हलकी आणि पौष्टिक ज्वारीची भाकरी** – ज्वारीची भाकरी हा पारंपरिक पदार्थ आहे. आजकाल लोक पुन्हा आवडीने ज्वारी खायला लागले आहेत. ज्वारीची भाकरी तब्येतीसाठी खूप फायदेशीर आहे.

**पचायला हलकी:** ज्वारीमध्ये ग्लूटेन नसते, त्यामुळे ती पोटाला हलकी वाटते. गॅस किंवा सिडिटीचा त्रास होत नाही.

**वजन कमी करण्यास मदत:** ज्वारीत भरपूर फायबर (चोथा) असतो. त्यामुळे भाकरी खाल्ल्यावर पोट बराच वेळ भरलेले राहते आणि लवकर भूक लागत नाही. यामुळे वजन नियंत्रणात ठेवायला मदत होते.




शुगरसाठी उत्तम: ज्वारी खाल्ल्याने रक्तातील साखर हळूहळू वाढते, त्यामुळे मधुमेहाच्या (डायबिटीज) रुग्णांसाठी ती खूप चांगली आहे.**पोट साफ राहते:** फायबर जास्त असल्यामुळे पोट साफ होण्यास मदत होते.

**मग, नक्की काय खायचं?**

वजन कमी करायचं असेल तर: तुमच्यासाठी ज्वारीची भाकरी हा उत्तम पर्याय आहे. ज्वारीत कॅलरीज कमी असतात.चांगल्या आरोग्यासाठी: दोन्ही चांगले आहेत, पण ज्वारी आरोग्यासाठी जास्त फायदेशीर आहे. विशेषतः उन्हाळ्यात ज्वारीची भाकरी शरीराला थंडावा देते. तुम्हाला गव्हाची पोळी पचत नसेल, तर ज्वारी हा सर्वोत्तम पर्याय आहे.

तुम्ही दोन्ही धान्ये एकत्र करून किंवा आलटून पालटून खाऊ शकता. उदाहरणार्थ, जेवणात एक ज्वारीची भाकरी आणि एक गव्हाची पोळी खाल्ली तर दोन्हीचे फायदे मिळतात.

# महाराष्ट्र गहाण ठेवला जातोय का?

महाराष्ट्र सरकारने महिलांच्या सक्षमीकरणासाठी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली आणि तिच्या अंमलबजावणीसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च अपेक्षित धरला गेला. या योजनेला निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने मद्याच्या किंमतीत वाढ केली, अनेक वस्तूंवर अतिरिक्त कर लावले आणि अप्रत्यक्षपणे सर्वसामान्य जनतेच्या खिशाला कात्री लावली. या निर्णयांमुळे जनतेत नाराजी पसरली आहे, कारण खर्चाच्या नावाखाली आर्थिक भार सामान्य माणसावर टाकण्यात येतो आहे.तर एकीकडे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे अनेक सवलतींच्या घोषणा करत आहेत – वीजबिल माफी, सामाजिक योजनांचे वाढते अनुदान, तर दुसरीकडे खिरापती प्रमाणे जनतेच्या गळ्यात काहीसे आंधळे वाटप केल्यासारखा निधी वाटला जातोय.जेव्हा अदानीसारख्या उद्योगसमूहाला शहरातील मोक्याच्या जागा कवडीमोल दरात दिल्या जातात, तेव्हा सरकारच्या आर्थिक प्राधान्यांवर प्रश्नचिन्ह उभं राहतं. एकीकडे सरकारला सामाजिक योजनांसाठी पुरेसा निधी नसल्याचं कारण सांगितलं जातं, आणि दुसरीकडे बहुराष्ट्रीय कंपन्यांना सार्वजनिक संसाधने कमी दरात वाटली जातात. ही दुटप्पी भूमिका लोकशाहीच्या मूळ तत्त्वांना अपमानित करणारी आहे.लाडकी बहीण योजनेसाठी पैसे कर वाढवून सामान्य माणसावर भार न टाकता, सरकारने आधीच असलेल्या निधींचं काटेकोर नियोजन केलं असतं तर ही योजना अधिक प्रभावी, परिणामकारक ठरली असती. अदानीला जी सवलत दिली जात आहे, त्याच किमतीत शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन त्यांना दिलासा देता आला असता.गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्र सरकारकडून जीएसटी परताव्याचा विषय सातत्याने उपस्थित केला जात आहे. राज्याने केंद्र सरकारकडे आपल्या हक्काचा हजारो कोटींचा जीएसटी परतावा मिळावा, अशी मागणी वारंवार केली आहे. मात्र अद्यापही हा परतावा पूर्ण स्वरूपात मिळालेला नाही. ही बाब राज्याच्या आर्थिक स्थितीसाठी अत्यंत गंभीर असून, याचा परिणाम थेट जनसामान्यांच्या आणि विशेषतः शेतकऱ्यांच्या जीवनावर होतो आहे. महाराष्ट्राला डबल इंजिन सरकारचा फायदा मिळेल का? किंबहूना महाराष्ट्र सरकार केंद्र सरकारकडुन निधी खेचुन आणु शकेल का? हा खरा प्रश्न आहे.परतावा मिळाला असता, तर कर्जमाफी शक्य होती!मुंबईसारख्या जागतिक शहरात मोक्याच्या जागेवरील भूखंडांची किंमत केवळ आर्थिक दृष्टिकोनातून नव्हे, तर सामाजिक आणि राजकीय महत्त्वाच्या आधारावरही ठरते. अशा परिस्थितीत महाराष्ट्र सरकारने अदानी उद्योग समूहाला कुर्ला येथील तब्बल २१ एकर जमीन अत्यंत माफक अटींवर देण्याचा निर्णय घेतला आणि त्यासोबतच धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या नावाखाली अनेक मोक्याच्या भूखंडांचं खासगीकरण केलं तेव्हा या सगळ्या घडामोडींनी गंभीर प्रश्न उभे केले आहेत.अदानी समूहाला या प्रकल्पासाठी जमिनी अत्यल्प दरात किंवा लीजवर दिल्या जात आहेत. या सवलती जनतेच्या पैशातून, म्हणजेच लोकसंपत्तीच्या खर्चातून दिल्या जात आहेत. राज्य सरकारकडे विकास कामांसाठी निधी कमी पडत आहे, हे सत्य आता उघड झालं आहे. सुमारे १ लाख कोटी रुपये कंत्राटदारांची बिले थकीत प्रकल्पांवर असून याचा थेट परिणाम रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण यासारख्या मूलभूत सुविधा पुरवणाऱ्या होणार आहे.महाराष्ट्रातील शेतकरी अनेक वर्षांपासून नैसर्गिक आपत्त्या, कर्जाचा बोजा आणि शेतीमालाला योग्य भाव न मिळाल्याने संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची मागणी सातत्याने केली जात आहे. महायुती सरकारने देखील शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, सरकारच्या आर्थिक स्थितीबाबतची विधाने आणि अदानींसारख्या उद्योगपतींना जमिनींच्या




वाटपाची प्रकरणे पाहता, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे भवितव्य अनिश्चित दिसत आहे.जर सरकारकडे पुरेसा निधी नसेल, तर कर्जमाफीसारखी मोठी योजना राबवणे आव्हानात्मक ठरू शकते. यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. त्यांना खऱ्या अर्थाने कर्जमाफी मिळणार का, आणि जर मिळाली, तर ती किती प्रमाणात आणि कधी मिळणार, हे प्रश्न अनुत्तरित आहेत.राज्याच्या अर्थव्यवस्थेची सध्याची स्थिती फारशी चांगली नाही, हे विविध आकडेवारीतून समोर येत आहे. महसुलात अपेक्षित वाढ होत नसताना, राज्यावरील कर्जाचा बोजा वाढत आहे. अशा परिस्थितीत, महसूल मंत्र्यांकडून होणाऱ्या सवलतींच्या घोषणा अनेक प्रश्न निर्माण करतात. या सवलतींच्या घोषणेमागे नेमका उद्देश काय आहे? जनतेला तात्पुरता दिलासा देण्याचा प्रयत्न की आगामी निवडणुकांवर डोळा ठेवून केलेली राजकीय खेळी?एकीकडे, पेट्रोल-डिझेलवरील करात कपात, विविध वस्तूंवरील जीएसटी दरात बदल किंवा इतर प्रकारच्या सवलती जाहीर केल्या जात आहेत. या सवलतींमुळे तात्पुरता दिलासा मिळत असला तरी, राज्याच्या महसुलावर त्याचा थेट परिणाम होतो.लाडकी बहीण योजनेसाठी लागणारा दरवर्षी सुमारे २४ ते २५ हजार कोटींचा खर्च उचलण्यासाठी आरोग्य, शिक्षण, कृषी, सार्वजनिक बांधकाम, आदिवासी विकास, महिला व बालकल्याण अशा अनेक विभागांचा निधी कपात करून वळवला जात आहे, ही बाब गंभीर चिंतेची आहे.निधी वळवण्याचा थेट परिणाम विकासावरआरोग्य सेवा आधीच अपुरी आहे. ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे यांना साधे औषधसाठा मिळत नाही, डॉक्टरांची कमतरता आहे, स्वच्छता तर नसल्यासारखीच आहे. अशा स्थितीत आरोग्य विभागाचा निधी वळवणे म्हणजे सामान्य जनतेच्या जीविताशी खेळ. शालेय शिक्षणासाठी आवश्यक इन्फ्रास्ट्रक्चर, शिक्षक भरती, शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे – या सर्व गोष्टींना आधीच पुरेसा निधी मिळत नाही. आता आणखी कपात झाल्यास ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्था अधिक खालावण्याची भीती आहे. शेतकऱ्यांसाठी सिंचन, बी-बियाणे, हमीभाव, कर्जमाफी यासाठीचा निधी कमी होण्याची शक्यता शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढीचं कारण ठरू शकते. रस्ते, पूल, पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधा रखडण्याची भीती आता वाढली आहे.राज्याच्या उत्पन्नावर आधीच कर्जाचा भार वाढत चालला आहे. अशा स्थितीत पुनरावृत्ती खर्च (ठशर्लीीळपस एुशिपवळींीश) वाढवणाऱ्या योजनांसाठी निधी वळवणं म्हणजे राज्याच्या आर्थिक आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम करणं. योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम महिला सुद्धा पात्र असतील, असं गृहित धरलं गेलं, तर त्याचा अर्थ टार्गेटेड सबसिडी ऐवजी सर्वसामान्य लोकलुभावन वाटप असा होतो.लाडकी बहीण ही कल्पना महिलांच्या सशक्तीकरणासाठी विधायक असू शकते, पण ती इतर आवश्यक क्षेत्रांचा बळी देऊन राबवली गेली, तर ती सामाजिक लाभापेक्षा राजकीय प्रचाराचं साधन ठरेल.जर सार्वजनिक संसाधने अशा प्रकारे खाजगी मालमत्ता बनवली जात राहिली, तर भविष्यात सामान्य जनतेसाठी स्थान शिल्लक राहणार नाही.



**नितीन देशमुख**
माजी नगरसेवक, अमरावती.

# अजित पवार यांच्यावर पक्षातीलच अनेक मोठे नेते नाराज

## पक्षाच्या बैठकीमध्ये देखील बोलवले जात नसल्याची खंत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ पुणे–** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांच्यावर पक्षातीलच अनेक मोठे नेते नाराज असल्याचे समोर आले आहे. पक्षांतर्गत या नाराजी मुळे पक्षात असंतोषाचे वारे वाहताना दिसत आहेत. ज्या पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरांवर अजित पवार यांची पकड मानले जाते, त्या पुण्यातीलच अनेक बडे नेते हे नाराज असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. यामध्ये पक्षातील काही माजी आमदारांचा देखील समावेश आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अजित पवार यांचे कट्टर समर्थक मानले जाणारे देवेंद्र भुयार, जुन्नरचे अतुल बेनके, दिलीप मोहिते पाटील, यशवंत माने, बाळासाहेब आजबे, सुनील टिंगरे हे पक्षात प्रचंड नाराज आहेत. पक्षातील कोणत्याच बैठकीला आपल्याला बोलावले जात नाही. तसेच पक्षात कोणतीही मोठी जबाबदारी अद्याप पक्षाने दिलेली नसल्याची खंत या नेत्यांनी व्यक्त केली आहे. पक्षात नवीन येणाऱ्या लोकांचा मानसन्मान केला जातोय. मात्र, पक्ष अडचणीत असताना पक्षाच्या सोबत असलेल्या माजी आमदारांना योग्य वागणूक दिली जात नाही, असा आरोप या नेत्यांनी केला आहे.

पक्षाच्या बैठकीमध्ये देखील बोलवले जात नसल्याची खंत पक्ष आणि अडचणीच्या काळात आम्ही पक्षाच्या सोबत होतो. मात्र नवीन येणाऱ्या माजी आमदारांना सन्मानाची वागणूक दिली जात आहे. तर दुसरीकडे सोबत असणाऱ्या माजी आमदारांना पक्षाच्या बैठकीमध्ये देखील बोलवले जात नसल्याची खंत या माजी आमदार आणि नेत्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे आता अजित पवार या सर्व नाराज नेत्यांची समजूत कशा पद्धतीने काढतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

बुधवार दि. २५ जून २०२५

शहर/ग्रामिण


# शैक्षणिक प्रवेशाच्या नावाखाली होणारी संभाव्य फसवणूक टाळण्यासाठी योग्य काळजी घ्या

## प्रवेश प्रक्रिया पूर्ण करताना सावधगिरी बाळगणे आवश्यक

## पोलीस उपायुक्त – कल्पना बारवकर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती –** सध्या कॉलेज आणि विद्यापीठानमध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांची आणि पालकांची धावपळ सुरु आहे. विद्यार्थी आणि पालक उत्तम नावाजलेल्या संस्थेत प्रवेश मिळावा म्हणून प्रयत्न करत असतात.याचाच गैरफायदा सायबर चोरटे घेत आहेत. अनेक नावाजलेल्या शिक्षण संस्थांच्या बनावट वेबसाईट तयार करून, लाखो रुपयांना गंडा घालत आहेत. नुकत्याच पुण्यातील एका नामांकित संस्थेच्या नावाने एमबीएसाठी खात्रीने प्रवेश मिळवून देतो, असे सांगून कोट्यावधी रुपयांची फसवणूक करण्यात आली. मात्र, पोलिसांनी कसून तपास करून या प्रकरणातील आरोपिंना पकडले आहे.

सायबर चोरटे अधिकृत नावात साम्य असलेल्या बनावट वेबसाईट अगदी बेमालूमपणे बनवतात.प्रथमदर्शनी त्यातील फरक मुळीच लक्षात येत नाही. समाज माध्यमावर ग्रुप करून त्यात आकर्षक जाहिराती, सवलतींचा वर्षाव करून विद्यार्थी आणि पालकांकडून





लाखो रुपये उकळले जात आहेत. प्रसिद्ध संस्थांची हुबेहूब लेटरहेड वापरून प्रवेशपरीक्षेत उत्तीर्ण झाल्याचे ई – मेल किंवा पत्राद्वारे कळवले जाते. काही सायबर चोरटे ' हमखास प्रवेश मिळवण्यासाठी मार्गदर्शन ' अशा खोट्या वेबसाईट चालवत आहेत. नावाजलेल्या संस्थांच्या नावाने खोटे फोनही केले जात असून, विद्यार्थ्यांना जाळ्यात ओढले जात आहे. हे सर्व प्रकार लक्षात घेऊन शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ किंवा अन्य शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश प्रक्रिया पूर्ण करताना सावधगिरी बाळगणे अत्यंत आवश्यक आहे. संबंधित प्रवेश प्रक्रियेत सहभाग नोंदवत असताना पुढीलप्रमाणे काळजी घेणे गरजेचे आहे. आपण प्रवेश घेत असलेल्या संस्थेची पूर्ण खातरजमा करावी. ती संस्था विद्यापीठ अनुदान आयोग किंवा अन्य आवश्यक त्या नियमक संस्थांशी संलग्न असल्याची खात्री करून घ्यावी. कोणत्याही ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर माहिती भरण्याआधी तो प्लॅटफॉर्म अधिकृत आहे, याची खात्री करावी. मर्यादित जागा अशा जाहिराती बघून दडपण घेऊन घाईगडबडीत निर्णय घेऊ नये. पैसे भरताना संस्थेच्या अधिकृत खात्यात भरावेत, मोठ्या रकमा आगाऊ भरू नयेत. त्या संस्थेचे आणि विद्यार्थ्यांचे अभिप्राय बघावेत. विविध मार्गांनी माहिती जाणून घ्यावी. शक्य असल्यास संबंधित संस्थेत समक्ष जाऊन यावे. विद्यार्थ्यांनी घरातील मोठ्या व्यक्तींच्या सल्लयानेच प्रवेशप्रक्रिया पूर्ण करावी. शैक्षणिक प्रवेशाच्या नावाखाली जर फसवणूक झाल्यास ताबडतोब http:// cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी आणि १९३० या नंबरवर संपर्क साधावा. ही यंत्रणा ज्या खात्यात पैसे गेले आहेत, ती खाती गोठवण्याचे तातडीने प्रयत्न करते.यासंदर्भात अधिक माहिती देण्यासह अमरावती स्थित पोलीस आयुक्तालय येथे पोलीस उपायुक्त ( मुख्यालय ) – कल्पना बारवकर यांनी दिली.

# डस्टबिन न ठेवल्यास दंडात्मक कारवाई; स्वच्छतेसाठी पाऊल

## वडाळी परिसर, डेपो रोडसह विविध भागात मनपा आयुक्तांचा दौरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती–** महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी मंगळवार, २४ जूनला वडाळी परिसर, चपराशीपुरा रोड, डेपो रोड, चौधरी चौक, विलास नगर व कॅम्प रोड परिसराची पाहणी केली. या दौऱ्यादरम्यान त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करत शहर स्वच्छता, सौंदर्यीकरण आणि आरोग्य व्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्वाचे निर्देश दिले. शहरातील रस्त्यांची नियमित साफसफाई, गटारांची देखभाल, पादचारी मार्गांवरील माती हटवणे, झाडे लावणे, बांधकाम साहित्याचे नियोजन आणि फुटपाथ स्वच्छ ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. प्लॉट धारकांना नोटीस देणे आणि सामाजिक संस्थांचे सहकार्य घेऊन परिसराचे सौंदर्यीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.



आयुक्त सौम्या शर्मा यांनी स्वच्छता कंत्राटदारांना स्पष्टपणे बजावले की, घंटागाडीला प्रत्येक नागरिकाच्या घरी जावेच लागेल. तसेच घनकचरा संकलनाचे वेळापत्रक स्थानिक गरजेनुसार निश्चित करावे आणि नाल्यांतील कचरा वेळेवर काढावा. स्वास्थ्य निरीक्षकांना आपापल्या प्रभागातील स्वच्छतेची जबाबदारी नियमितपणे पार पाडण्याचे आदेश देण्यात आले. मनपा राजापेठ कोठा येथून नोटीस बुक घेऊन फेरीवाले, दुकानदार, हॉकर्स यांना डस्टबिन न ठेवणे किंवा इतरत्र कचरा फेकणे यासंदर्भात नोटीस द्याव्यात तसेच दररोज याचा अहवाल सादर करावा, असे निर्देश त्यांनी दिले.या दौऱ्यात वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, सहायक आयुक्त भूषण पुसतकर, सहायक आयुक्त नितीन बोबडे, स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले, शहर समन्वयक श्वेता बोके, स्वास्थ निरीक्षक, साफ सफाई कंत्राटदार, मनपा कर्मचारी उपस्थित होते. शहरात स्वच्छतेसाठी मनपा प्रशासन सज्ज झाले असून, नागरिकांच्या सहकार्याने स्वच्छ अमरावतीचा संकल्प हक्काचा होणार, हे या पाहणी दौऱ्याने अधोरेखित झाले आहे. शहरातील हॉकर्स आणि आस्थापनांना डस्टबिन ठेवणे आता बंधनकारक असून, उघड्यावर कचरा फेकणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. 'शहर स्वच्छ व सुंदर व्हावे' यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्तांनी केले. नागरिकांनी कचरा योग्य ठिकाणीच टाकावा आणि स्वच्छतेच्या सवयी अंगीकाराव्यात, असे आयुक्त सौम्या शर्मा यांनी स्पष्ट केले.

# नक्षलग्रस्त, दुर्गम भागामध्ये योगाचा दीप प्रज्वलित करणाऱ्या मेघा ठाकरेंचा 'योगरत्न' पुरस्काराने सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ नांदगाव पेठ–** नक्षलग्रस्त आणि दुर्गम भाग असलेल्या गोंदिया जिल्ह्यात गेली १२ वर्षे निरंतर मोफत योग विद्येचा प्रचार करणाऱ्या, ग्रामीण जीवनात योगाची ज्योत पेटवणाऱ्या अमरावती येथील प्रसिद्ध योग निसर्गोपचार व आहार तज्ञ मेघा लक्ष्मण ठाकरे यांना नुकतेच 'योगरत्न' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, एजीएमए व आयुष विभाग यांच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित विशेष समारंभात त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.या पुरस्कार वितरण सोहळ्याचे उद्घाटक डॉ. बाळासाहेब पवार तर प्रमुख पाहुणे म्हणून आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. नितीन राजे पाटील उपस्थित होते. मेघा ठाकरे यांनी गोंदिया जिल्ह्यातील अनेक आदिवासी व मागास भागांमध्ये जाऊन ३६० पेक्षा अधिक मोफत योग शिबिरे घेतली.



गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुका हा अति नक्षलग्रस्त भाग होता. येथे काम करताना सुरुवातीला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. धीराने त्या अडचणींवर मात केली. मानसिक त्रासही झाला. मात्र, गावागावांत योगविद्या पोहोचवण्याचा संकल्प असल्याने जिद्दीने त्या ठिकाणी काम केले. महिलांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यामुळे नंतर संपूर्ण जिल्ह्यात योगविद्या शिकवण्याचा मार्ग सुकर झाला. कठीण परिस्थितीत केलेल्या कामाचे फळ योगरत्न पुरस्काराच्या माध्यमातून मिळाल्याने आनंदीत आहे. हा पुरस्कार सर्व योग साधकांना समर्पित करते.

**–डॉ. मेघा ठाकरे**, योग, निसर्गोपचार तज्ज्ञ, अमरावती.

केवळ योगाभ्यासच नव्हे तर वृक्षारोपण, जनजागृती रॅली, शालेय योग शिबिरे व बालसंस्कार शिबिरांच्या माध्यमातून त्यांनी समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण केली आहे. गेल्या चार वर्षांपासून त्यांनी अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागातही योग प्रसाराचे कार्य हाती घेतले असून, त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेऊन 'योगरत्न' या पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला.

समाजात आरोग्य, मानसिक स्वास्थ्य आणि नैतिक मूल्यांची जागृती घडवणाऱ्या अशा व्यक्तिमत्त्वांचा सन्मान हा संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी ठरत असतो. योगसाधना आणि सामाजिक बांधिलकी यांची अभूतपूर्व सांगड घालणाऱ्या मेघा ठाकरे यांचे कार्य हे इतरांसाठीही मार्गदर्शक ठरत असून, त्यांना मिळालेल्या या मानाच्या पुरस्कारामुळे जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# नांदगावपेठ परिसरात ट्रकचालकाला जबर मारहाण, किडनॅप करुन २७ टन तांदळाची लूट; २९ लाखांचा मुद्देमाल ६ तासात जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती–** नांदगावपेठ पोलिस ठाणे हद्दीतील सेलिब्रेशन हॉल, रिंगरोड परिसरात ट्रकचालकाला मारहाण करून अपहरण करत तब्बल २७ टन तांदूळ लुटल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. गुन्हा घडल्यानंतर केवळ ६ तासांत पोलिसांनी २९ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करत दोन आरोपींना अटक केली.फिर्यादी निझामुद्दीन मोहम्मद सईद (५४, रा. जळगाव) हे गोंदिया येथे तांदूळ घेऊन निघाले असताना



४ अनोळखी इसमांनी त्यांचा ट्रक (चक २० एक्र २६३९) सेलिब्रेशन हॉलजवळ थांबवून त्यांना खाली उतरवून मारहाण केली. त्यानंतर डोळ्याला पट्टी बांधून दुसऱ्या वाहनात जबरदस्तीने बसवले आणि चार तास फिरवून निर्जनस्थळी सोडले. ट्रकसह २७ टन तांदळाची (सुमारे ७ लाख रुपये किंमतीची) चोरी करण्यात आली. घटनेनंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट–१ ने तपास सुरु केला. लालखडी परिसरात ट्रक असल्याची माहिती मिळाल्यावर पोलिसांनी छापा घालत आरोपी अजमत खान करामत खान (रा. रहेमत नगर) आणि शेख इम्रान शेख रहमान (रा. हबीब नगर) यांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून १६ चाकी टाटा ट्रक (किंमत २२ लाख) आणि तांदळासह २९ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपआयुक्त कल्पना बारवकार, सागर पाटील, शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. गोरखनाथ जाथव व त्यांच्या पथकाने केली.

# बाधित फळपिकांनाही भरपाई, योजनेला मुदतवाढ, पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना; शासनाकडून ३० जूनपर्यंतची वेळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती–** संत्रा, पेरू, लिंबू पिकांचा विमा काढण्यासाठी १४ जून ही मुदत होती. मात्र, अनेक उत्पादकांची अखेरच्या दिवशी विमा काढण्यासाठी धावपळ झाली. यामध्ये काही जण बाकी राहिले होते. त्यामुळे शासनाने योजनेला पुन्हा एकदा मुदतवाढ दिली आहे. आता ३० जूनपर्यंत या योजनेत सहभागी होता येणार आहे.

हवामान आधारित फळपीक विमा योजनेत शेतकऱ्यांना सहभागी होता यावे, यासाठी पोर्टल सुरू करण्यात आले आहे. यामध्ये अधिसूचित पिकांसाठी फार कमी वेळ दिला होता. त्यामुळे कागदपत्रे जमवून योजनेत सहभागी होण्यासाठी उत्पादकांना कसरत करावी लागली. त्यातच काही शेतकरी बाकी राहिल्याने त्यांच्यामध्ये शासनाप्रती नाराजी होती. अखेर या योजनेची मुदत वाढवण्यात आली. या योजनेत तांत्रिक दोषामुळे पोर्टल १३ तारखेला सुरू झाले. अवघा ३० तासांचा अवधी शेतकऱ्यांना मिळाला होता. त्यामुळे शासनाने आता मुदतवाढ देऊन अवधी ३० जूनपर्यंत वाढवला आहे. दरम्यान या योजनेत सहभागी होण्यासाठी



सर्वात महत्त्वाचा फार्मर आयडी, आधारकार्ड, बँक खाते तपशील, सात–बारा, जिओ टॅगिंग केलेला फोटो असणे बंधनकारक आहे. या कागदपत्रांसाठी शेतकऱ्यांना धावपळ करावी लागली. हवामान आधारित फळपीक विमा योजनेत संत्रा, मोसंबी, डाळिंब, आंबा, केळी, द्राक्षे आणि प्रायोगिक तत्त्वावर स्ट्रॉबेरी व पपई या फळपिकांचा समावेश करण्यात आला आहे.या योजनेत मृग बहारासाठी शेतकऱ्यांना सहभागी होता यावे, यासाठी पीक विमा योजनेचे पोर्टल सुरू करण्यात आले आहे. या वर्षी शेतकऱ्यांना फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आलेला आहे.

पीक मदत संत्रा १ लाख मोसंबी १ लाख पेरू ७० हजार चिकू ७० हजार डाळिंब १.६० लाख लिंबू ८० हजार सीताफळ ७० हजार द्राक्ष ३.८० लाख

### अधिकाधिक शेतकऱ्यांना योजनेचा लाभ घेता येईल

हवामानातील धोक्यांमुळे फळपिकांचे नुकसान होते. अशावेळी परतावा मिळण्यास ही योजना उपयुक्त आहे. शिवाय या योजनेला ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याने अधिकाधिक शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होता येईल.

**राहुल सातपुते,** जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अमरावती.

# रक्षाबंधनपूर्वी होणार लाडक्या बहिणींची पतसंस्था : महायूतीचा निर्णय

## सहकार विभागाचे नियोजन : जिल्ह्यात ३ लाख ५२ हजार ४१ लाभार्थी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती–**

महिला व बालविकास विभागाच्या वतीने महिलांसाठी दरमहा १ हजार ५०० रुपये देणारी लाडकी बहीण योजना राबविली जात आहे. या योजनेतील लाभार्थी महिलांची नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्यासाठी सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी आदेश दिले आहेत. सोलापूर जिल्ह्यात रक्षाबंधनपूर्वी (९ ऑगस्ट) लाडक्या बहिणींची नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्यासाठी जिल्ह्यातील सहकार विभागाने नियोजन केले आहे.

अमरावती महापालिका हद्दीत वॉर्ड व प्रभाग पातळीवर पतसंस्था स्थापन करण्यासाठी ८०० महिला सदस्यांची अट घालण्यात आली आहे. याकरिता नोंदणीसाठी १० लाख रुपयांचे भागभांडवल आवश्यक आहे. महापालिका कार्यक्षेत्रासाठी किमान १५०० महिलांची अट घालण्यात आली असून, यासाठी २० लाख रुपयांच्या भागभांडवलाची अट घालण्यात आली आहे. नगरपालिका हद्दीसाठी ५०० महिला व पाच लाख रुपयांचे भागभांडवल, गावासाठी २५० महिला व १ लाख ५० हजारांचे महिलांची नागरी सहकारी



पतसंस्था स्थापन करण्याबाबत सविस्तर आदेश मिळाले आहेत. या आदेशानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना प्रत्येक तालुक्याला दिल्या आहेत. भागभांडवल, तालुका पातळी वरील पतसंस्थेसाठी ५०० महिला व पाच लाख रुपये भाग भांडवलाची अट असणार आहे. जिल्हा पातळीवरील पतसंस्थे साठी १५०० महिला व १० लाखांच्या भागभांडवलाची अट घालण्यात आली आहे. जिल्ह्यात लाडकी बहीण योजनेच्या ३ लाख ५२ हज़ार ४१ एवढ्या महिला लाभार्थी आहेत. जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी जिल्ह्यातील सर्व सहायक निबंधकांना या संदर्भातील सूचना दिल्या आहेत. त्या–त्या तालुक्यातील लाभार्थी महिलांची यादी महिला व बाल विकास विभागाकडून घेऊन तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या आहेत. पतसंस्था निर्मितीसाठी प्रवर्तक महत्त्वाचा असल्याने प्रवर्तक हा गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसल्याबाबतचे अद्ययावत प्रमाणपत्र संबंधित पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यां कडून घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

रक्षाबंधनपूर्वी जिल्ह्यातील लाडक्या बहिणींच्या पतसंस्थेची नोंदणी करून त्यांना रक्षाबंधनचे गिफ्ट देण्याचे आमचे नियोजन आहे. त्या दृष्टीने आम्ही प्रयत्न सुरू केले आहेत.

– **शंकर कुंभार** जिल्हा उपनिबंधक, अमरावती



# २४ गोवंशाची सुटका: टायर फुटल्यानंतरही ७० किलोमीटर पर्यंत चालवला गोवंश तस्कराने ट्रक

## वडकी पुलावर वाहन सोडून काढला पळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५यवतमाळ–** नागपूर ते हैदराबाद या राष्ट्रीय महामार्गावर जनावरांची तस्करी करणाऱ्या एका ट्रकला वडकी पोलिसांनी ताब्यात घेतले असून या ट्रकमधून २४ गोवंशांची सुटका करण्यात आली. ही कारवाई सोमवारी दि. २३ जूनला करण्यात आली. या ट्रकचा टायर फुटल्यानंतर देखील जवळपास ७० किलो मीटरपर्यंत ट्रक चालकाने राष्ट्रीय मार्गावर बेकायदेशीरपणे ट्रक चालवत होता. दरम्यान पोलिस आणि गोरक्षक पाठलाग करीत असल्याने तस्करांनी वडकी



येथील पुलावर ट्रक उभा करीत अंधाराचा फायदा घेत पळ काढला.

या प्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, नागपूर येथून ट्रक क्रमांक एकएच–३१–सीबी–६४९० यामध्ये अवैधरित्या जनावरांना कोंबून कत्तलीसाठी घेवून जाण्यात येत होते. याबाबतची माहिती गोरक्षकांना मिळाली. त्यावरून गोरक्षक आणि पोलिस प्रशासनाने त्या ट्रकचा बुट्टीबूरीपासून पाठलाग केला. अश्यातच त्या ट्रकचा मागील टायर फुटला, मात्र १४ चाकी ट्रक असल्याने चालकाने ट्रक न थांबवताच डिक्सवर जवळपास सत्तर किलो मीटरपर्यंत पळवतच नेला. चालकाला लक्षात येताच त्याने ट्रक सोडून अंधाराचा फायदा घेत पळ काढला. या प्रकरणी २४ गोवंशाची सुटका करीत ट्रकसह २४ लाख ८० हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई वडकी ठाणेदार सुखदेव भोरकडे, पथकातील निलेश वाढाई, विनोद नागरगोजे, निलेश निमकर, आकाश कुदुसे यांनी पार पाडली.

> जनावर तस्करी करणारे वाहन वडकी पोलिस ठाण्याच्या हद्दीतून जात असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पोलिस ठाण्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना घेवून वडकी उड्डाणपुल येथे नाकाबंदी करण्यात आली. ही बाब ट्रक चालकाच्या लक्षात येताच त्याने ट्रक सोडून अंधाराचा फायदा घेत पळ काढला. या प्रकरणी अज्ञात तस्करांवर विविध कलमान्वये गुन्हा नोंद केला आहे. **– सुखदेव भोरखडे, ठाणेदार, वडकी.**

# संभाजीनगरात भीषण अपघात

## भरधाव कार दुभाजकाला धडकून उलटली, ३ जण जागीच ठार!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५संभाजी नगर**
छत्रपती संभाजीनगर–जळगाव राष्ट्रीय महामार्गावर भरधाव कार दुभाजकाला धडकून उलटल्याने भीषण अपघात घडला. या अपघातात कारमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला. तर, दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी स्थानिक पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.




छत्रपती संभाजीनगर–जळगाव राष्ट्रीय महामार्गावरील बिल्डा फाट्याजवळ मंगळवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास भरधाव कारने पुलावरील दुभाजकाला धडकल्याने तिघेजण जागीच ठार झाले असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. सय्यद मारुफ सय्यद माजेद (वय, १८), अरफात बागवान (वय, २०), रेहान सय्यद (सर्व रा. मोतीलालनगर, छत्रपती संभाजीनगर) अशी मृतांची नावे आहेत.

छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी असलेले पाच जण कार (एमएच २० इ जे १५८६) ने फुलंब्रीहून छत्रपती संभाजीनगरकडे येत होते. मंगळवारी रात्री ११च्या सुमारास त्यांची भरधाव कारने बिल्डा गावानजीक असलेल्या पुलावरील रस्ता दुभाजकाला जोराची धडकली. त्यानंतर ही कार उलटली.

यात कारमधील सय्यद मारुफ सय्यद माजेद, अरफात बागवान व रेहान सय्यद यांचा जागीच मृत्यू झाला, तर सय्यद उजेफ व शेख शारीक हे दोघे गंभीर जखमी झाले. याबाबत माहिती मिळताच फुलंब्री पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजय सहाणे हे कर्मचाऱ्यांसह तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

# आणीबाणीवर आधारित जिल्हास्तरीय प्रदर्शनाचे आज उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती, –** देशात १९७५ ते १९७७ दरम्यान आणिबाणी होती. या काळात नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर मर्यादा आल्या आणि प्रसारमाध्यमांवर सेन्सॉरशिप लादली गेली. याबाबत आवाज उठवणाऱ्या अनेक व्यक्तींना तुरुंगवास झाला. त्याचे स्मरण म्हणून जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हा प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्या, बुधवार, दि. २५ जून रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन विभागीय आयुक्त श्वेता सिंघल तसेच जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी उपसंचालक (माहिती) अनिल आलूरकर उपस्थित राहतील.

आणीबाणी संदर्भातील प्रदर्शनासोबतच यावेळी ज्या व्यक्तींना बंदिवास भोगला अशा आणीबाणीतील कार्यकर्ते तसेच नागरिकांचा प्रशासनामार्फत महसूल भवन येथे सन्मानित केले जाणार आहे. या समारोहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र बहाल केले जाणार आहे.

या समारोहास जिल्ह्यातील सर्व मिसा व डीआयआर अंतर्गत आणिबाणी सन्मानधारक यांना समारंभाला उपस्थित राहण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी केले आहे.

# मध्य रेल्वे मार्गावर स्लीपरला तडे? संततधार पावसाचा परिणाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ मूर्तिजापूर –** मध्य रेल्वे मार्गावर अकोला ते मूर्तिजापूरदरम्यान काही भागात रुळाखालील 'स्लीपर'ला तडे गेल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे रुळाच्या सुरक्षेसाठी लावण्यात आलेल्या लोखंडी कड्या देखील निखळून पडल्या आहेत. रेल्वेच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला असून त्याची चित्रफित समाजमाध्यमातून प्रसारित झाली. मात्र, असा कुठलाही प्रकार घडला नसून मध्य रेल्वेची वाहतूक सुरळीत असल्याचे मध्य रेल्वे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

रेल्वे रुळाच्या खालील भागात 'स्लीपर' असतात. ते रुळांना आधार देण्यासाठी आणि योग्य अंतरावर ठेवण्यासाठी वापरले जातात. रेल्वे रुळाखाली पसरलेली दगडांच्या थरामुळे स्लीपरला स्थिर ठेऊन पाण्याच्या निचरा होण्यास मदत होते. 'स्लीपर'मुळे रुळांची स्थिरता वाढून रेल्वेगाड्या सुरक्षितपणे चालू शकतात. 'स्लीपर' सिमेंटचे बनलेले असतात. दरम्यान, मध्य रेल्वेच्या अकोला ते मूर्तिजापूरदरम्यान रेल्वे मार्गावरील रुळाखालील काही 'स्लीपर'ला तडे गेल्याचा प्रकार मंगळवारी समोर आला आहे.

'स्लीपर'ला तडे गेल्यामुळे त्याला लावलेल्या लोखंडी कड्या देखील काही ठिकाणी निखळून पडल्याचे दिसून आले आहे. या संदर्भात समाज माध्यमावर छायाचित्र व चित्रफित प्रसारित झाली. या धक्कादायक प्रकारामुळे रेल्वेच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. मध्य रेल्वेचा हा सर्वात व्यस्त मार्ग आहे. या मार्गावरून काही मिनिटांच्या अंतरावर गाड्या वेगाने धावतात. अकोला ते मूर्तिजापूरदरम्यान 'स्लीपर'ला तडे गेल्याच्या प्रकारामुळे खळबळ उडाली. मध्य रेल्वे प्रशासनाने मात्र असा कुठलाही प्रकार घडला नसल्याचे स्पष्ट केले आहे. रेल्वे मार्गाची नियमितपणे तपासणी केली जाते. या तपासणीमध्ये 'स्लीपर' क्षतिग्रस्त किंवा लोखंडी कड्या निघाल्याचे कुठेही आढळले नाही. मध्य रेल्वे मार्गावरील रेल्वेची वाहतूक सुरळीतपणे सुरू आहे, अशी माहिती मध्य रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी जीवन चौधरी यांनी दिली.



### पावसाचा परिणाम?

अकोला जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पाऊस सुरू आहे. या पावसामुळे मध्य रेल्वेच्या मार्गावरील 'स्लीपर'वर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या अगोदर देखील मूर्तिजापूर जवळच जबर पावसाचा मध्य रेल्वेला फटका बसला होता. गेल्या वर्षी मुसळधार पावसामुळे मूर्तिजापूरजळव रेल्वे मार्गाखालील भराव वाहून गेला होता. त्यामुळे रेल्वेची वाहतूक विस्कळीत होऊन अनेक रेल्वे गाड्या खोळंबल्या होत्या. विविध रेल्वे गाड्यांचे मार्ग बदलले होते, तर काही गाड्या रद्द देखील केल्या होत्या. या प्रकाराचा प्रवाशांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागला होता.

# पुणे रेल्वे स्टेशनचे नाव बदलणार!

## भाजपा खासदाराने केली ही मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५पुणे–** आता महाराष्ट्रातील नाव बदलणाऱ्यांच्या यादीत पुणे स्टेशनचे नाव जोडता येईल. पुणे रेल्वे स्टेशनचे नाव बदलण्याची मागणी होत आहे. भाजपाच्या राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी पुणे रेल्वे स्टेशनचे नाव बदलून थोरले बाजीराव पेशवे करावे, ज्यांना 'बाजीराव–१' असेही म्हणतात, अशी मागणी केली. १७२० ते १७४० दरम्यान छत्रपती शाहूजी महाराजांच्या राज्यात बाजीराव–१ हे पंतप्रधान होते. त्यांच्या लष्करी सामर्थ्यासाठी तसेच मराठा साम्राज्याच्या विस्तारासाठी त्यांना स्मरणात ठेवले जाते. इतिहासात अशी नोंद आहे की थोरले बाजीराव पेशवे यांनी त्यांच्या आयुष्यात कोणतेही युद्ध हरले नाहीत.माध्यमांच्या वृत्तानुसार, २३ जून रोजी पुणे आणि सोलापूर रेल्वे विभागाची बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत अनेक संघटनांनी पुणे रेल्वे स्टेशनला थोरले बाजीराव पेशवे यांचे नाव देण्याची मागणी केली होती. भाजपा खासदार मेधा कुलकर्णी म्हणाल्या की त्यांनी ही मागणी पुन्हा एकदा मांडली आहे.राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी म्हणाल्या की, या




मागणीमागील त्यांचा उद्देश लोकांना पुण्याच्या गौरवशाली इतिहासाची माहिती व्हावी हा आहे. त्या म्हणतात की पुणे हे एक सांस्कृतिक आणि शैक्षणिक केंद्र आहे. ते आयटी उद्योगासाठी देखील ओळखले जाते, परंतु पुण्यासह इतर शहरे आणि राज्यातील लोकांनाही या शहराचा इतिहास समजून घेणे आणि जाणून घेणे महत्वाचे आहे.खरं तर, पुणे शहराला छत्रपती शिवाजी महाराज आणि बाजीराव पेशव्यांचा मोठा इतिहास आहे. पुण्याचा शनिवारवाडा ज्याच्याशी जोडलेला आहे, तो मराठा साम्राज्याचा समृद्ध इतिहास आहे. येथे पेशव्यांच्या राजवटीचा एक जुना वाडा आहे जो पेशव्यांच्या इतिहासाचे प्रतिबिंबित करतो. म्हणूनच पुण्याच्या ऐतिहासिक वारशाचा हवाला देत खासदारांनी पुणे जंक्शनचे नाव बदलण्याची मागणी केली आहे.

# 'समृद्धी'वर शहापूरजवळ ओव्हरपासच्या पुलावर १९ दिवसांतच पडले खड्डे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.कसारा मुंबई –** मुंबई–नागपूर समृद्धी महामार्गाच्या आमने ते इगतपुरी या शेवटच्या टप्प्याचे उद्घाटन होऊन १९ दिवस होत नाही तोच या मार्गावर खड्डे पडले आहेत. ७६ किमी लांबीच्या या मार्गासाठी २,८०० कोटी रुपयांचा खर्च आला आहे. आमने येथून पुढे ३१ किलोमीटरवर शहापूरजवळ ओव्हरपासच्या पुलावर खड्डे पडले आहेत. त्यामुळे राज्य महामंडळाच्या रस्ते विकास (एमएसआरडीसी) कामावर टीका होत आहे.

मुंबई ते नागपूर जलद प्रवासासाठी 'एमएसआरडीसी'ने ७०१ किमी लांबीच्या महामार्गाची उभारणी केली आहे. त्यासाठी ६१ हजार कोटी रुपयांचा खर्च आला आहे. त्यातील आमने ते इगतपुरी या ७६ किलोमीटर लांबीच्या मार्गाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ५ जूनला लोकार्पण झाले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार उपस्थित होते. शेवटच्या टप्प्याच्या महामार्गावर अनेक त्रुटी आहेत. २० दिवसांत ११ अपघात झाले आहेत. अनेक वाहने नादुरुस्त होत असल्याचे वाहनचालकांचे म्हणणे आहे. नवयुगा इंजिनिअरिंग कंपनीने हे काम केले आहे. या मार्गावर उभारलेल्या अंडरपासवर उभारलेल्या रस्त्यावर हे खड्डे पडले आहेत. मात्र, काँक्रीटच्या रस्त्याला कोणतीही हानी झाली नाही.काँक्रीटच्या अंडरपासवर डांबरीकरण केले आहे. येथे सतत पाऊस सुरू आहे. त्यामुळे डांबरावर एका ठिकाणी छोटे खड्डे पडले आहेत. मात्र, पुलाच्या स्ट्रक्चरला कोणतीही हानी झाली नाही. आता खड्डे भरण्यात आले आहेत, असे अधिकाऱ्यांनी नमूद केले.समृद्धी महामार्ग वाहतुकीला खुला करण्यापूर्वी एप्रिलमध्ये या ७६ किमी लांबीच्या मार्गाच्या २४ पॅनलला काही भेगा आढळल्या होत्या. त्यावेळीही 'एमएसआरडीसी'वर टीका झाली होती, तसेच काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगरजवळ पुलावरील पॅनल कोसळल्याचे समोर आले होते.




# भातकुली तालुक्यातील सायत ग्रामपंचायतचा मोठा निर्णय

## जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घ्या,घरपट्टी व पाणी पट्टी माफ

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२५भातकुली–** आपल्या गावातील जिल्हा परिषद शाळा टिकली पाहीजे या करीता गावातील ग्रामपंचायतने पुढाकार घेऊन शाळेत पहील्या वर्गात प्रवेश घेणार्या विद्यार्थांच्या पालकांना घरपट्टी कर व पाणीपट्टीकर माफ करण्याचा मोठा निर्णय अमरावती जिल्हातील भातकुली तालुक्यातील सायत ग्रामपंचायतने घेतला आहे.या निर्णयामुळे गावातील शासकीय शाळांची पटसंख्या वाढण्यास मदत होणार असुन गावातील जिल्हा परिषद शाळा टिकण्यास मदत होणार आहे. संध्दा जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या कमी होऊन काही शाळा शेवटची घटका मोजत आहे.गावातच प्राथमिक शिक्षण मिळावे या करीता प्रत्येक गावात प्राथमिक काही गावात माध्यमिक शाळा शासनाने शाळा सुरु केल्या पण खाजगीकर करण्या करीता खाजगी,विना अनुदानित शाळा,स्वयंशासीत शाळा आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु झाल्यामुळे शासकीय व अनुदानित शाळा बंद पडण्याच्या अवस्थेत आल्या.गाव करी ते राव नाही करी अश्या म्हणी प्रमाणे गावाने पुढाकार घेतला तर अशक्य होणारी गोष्ट शक्य होऊ शकते.शासकीय आणि अनुदानित शाळेत प्रशिक्षित शिक्षक असतात.तर खाजगी विना अनुदानित आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळेत कमी शैक्षणिक पात्रता असणारे शिक्षक नेमल्या जातात.त्यामुळे विद्यार्थांना दर्जेदार शिक्षण मिळत नाही उलट हजारो रुपये फी पण भरावी लागते.आणि वाहतुकीचा,शालेय साहीत्य,गणवेश आणि शाळेत राबविल्या जाणारे विविध उपक्रम या करीता पालकांना आर्थीक भरणा करावा लागतो.पण शासकीय शाळेत सर्व मोफत मिळते आणि प्रशिक्षित शिक्षक यांच्या कडून दर्जेदार शिक्षण दिल्या जाते.पण शासनाने शिक्षकाकडे अशैक्षणिक कामे दिल्यामुळे आणि विविध शिक्षणा वेतीरीक्त कामे दिल्यामुळे शासकीय शाळेची पटसंख्या कमी होत आहे.यामुळे गावातील शाळा शेवटच्या घटका मोजत आहे.म्हणुन सायत ग्रामपंचायत सारखा निर्णय प्रत्येक गावातील ग्रामपंचायने घेतल्यास गावातील विद्यार्थी गावातीलच शासकीय शाळेत शिकतील आणि या निर्णयामुळे शिक्षणक्षेत्रात मोठा बदल होईल आणि बेरोजगार डी.एड् व बी.एड् या नोकरी उपलब्ध होईल असे अनेक फायदे अश्या निर्णयामुळे होतील. भातकुली पंचायत समिती मधिल सायत ग्रामपंचायच्या सरपंच सौ. अन्नपुर्णा ज्ञा. मानकर,उपसरपंच विशाल सु. भट्टड,सचिव विनय



ना. ठोंबरे तसेच ग्राम पचायचे सर्व सदस्य यांनी सर्व सायत ग्रामस्थांना विनंती केली कि, जे ग्रामस्थ आपल्या पाल्यांना ( मुलांना / मुलीना) गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रवेश घेतील त्यांना त्यांचे नावावरील मिळकतीची (घराची) घरपट्टी व पाणीपट्टीचा कर पूर्ण माफ राहील याची सर्व ग्रामस्थांनी नोंद घ्यावी अशा आदर्श निर्णय घेतला आहे.या निर्णयाचा फायदा गावातील जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या वाढण्यास मदत होणार आहे.या आदर्श निर्णयाचे सर्वांनी स्वागत केले असुन इतर ग्राम पंचायतने सुध्दा अश्या प्रकारचे निर्णय घ्यावे आणि शासकीय शाळा वाचव्यात अशी अपेक्षा शिक्षकांनी व्यक्त केली आहे.

# अंजनगाव तालुक्यात ‘सेतू’ केंद्र चालकांची वाढली मनमानी

## दाखल्यांसाठी आर्थिक पिळवणूक: सर्वसामान्यांची लूटतहसील प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अंजनगाव सुर्जी**

पेपरलेस ऑफिसचा नारा देत सरकारने सर्व कामे ऑनलाईन केली. सर्वसामान्यांना कमी खर्चात कोणतेही प्रमाणपत्र देण्या साठी महा ई-सेवा अर्थात सेतू केंद्र सुरूकेली. त्यांना शासनाने दर ठरवून दिले आहेत परंतु शासनाच्या उद्देशाला ई-सेवा चालकांकडून हरताळ फासला जात आहे. चाळीस ते पन्नास रुपयांमध्ये मिळणाऱ्या प्रमाणपत्रांसाठी विद्यार्थी व त्यांच्या पालकांना १०० ते ३०० रुपये किंमत मोजवी लागत असल्याची परिस्थिती आहे. तहसील प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने सर्वसामान्य पालक आणि विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक होत आहे.




सध्या शैक्षणिक वर्ष २०२५ २६ च्याप्रवेशासाठी विद्यार्थी व पालकांची लगबग सुरू आहे. तंत्रशिक्षण, कौशल्य अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी जात प्रमाणपत्र, डोमेसाईल, जातवैधता, नॉन क्रिमिलेअर, ईडब्ल्यूएस, अपंगत्वाचे प्रमाणपत्र आदी दाखल्यांसाठी विद्यार्थ्यांची धावपळ सुरू आहे. या सर्वच कागदपत्रांसाठी शासनाने दर जाहीर केले आहेत, परंतु अनेक ई-सेवा केंद्रचालक शासन निर्णय पायदळी तुडवत मनमानी रक्कम वसूल करत आहेत. कागदपत्रे वेळेत मिळविण्यासाठी विद्यार्थी व पालकांनादेखील नाईलाजास्तव जास्तीची रक्कम द्यावी लागत असून लुट करणाऱ्या सेवा केंद्राच्या तोंडी तक्रारी तहसील कार्यालयात केल्या असून आज रोजी कोणावरही कारवाई करण्यात आली नसल्याने मनमानी करणाऱ्या ई-केंद्रचालकांवर कारवाई कोण करणार? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

### निश्चित केलेल्या दरापेक्षा दुपटीने घेतात पैसे

शैक्षणिक वर्षासाठी आवश्यक असलेले दाखले मिळविण्यासाठी पालकांची धावपळ सुरू आहे. दाखल्यांचा कालावधी आणि दर निश्चित करून देण्यात आले आहेत. त्यानुसार कारवाई होणे अपेक्षित आहे. तालुकास्तरावर तहसीलदारांच्या मार्गदर्शनात महा ई-सेवा केंद्रांवर नियंत्रण असते, मात्र विद्यार्थ्यांची लूट होत असताना कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. शासनाचे महत्त्वाचे दस्तऐवजाचे दर निश्चित केलेले असून त्यातील नेहमी लागणारे उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, अधिवास प्रमाणपत्र याचे दर ३४ रुपये नॉनक्रिमीलेअर ५८, जात प्रमाणपत्र ३५ असे निश्चित केले असताना या केंद्रावर ग्राहकाची निकड पाहून प्रत्यक्षात ८० रुपयांपासून २०० रुपयांपर्यंत दर आकारले जात आहेत.

# जिल्ह्यामध्ये १ हजार ६५० गावांत ‘स्वच्छ सर्वेक्षण’ मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

अमरावती जिल्ह्यात स्वच्छ भारत मिशन आराखड्यातील १ हजार ६५० गावांत स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ या उपक्रमांतर्गत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनात निर्माण झालेल्या सुविधांचा वापर तसेच सार्वजनिक ठिकाणी असलेले परिसर स्वच्छता शिवाय प्रत्येक कुटुंबांना भेटी देऊन बदललेल्या मानसिकतेची माहिती घेण्यासाठी केंद्र शासनाच्यावतीने पाहणी करण्यात येणार आहे.

सर्व ग्रामस्थांनी मिळून लोकसहभाग व श्रमदानातून या सार्वजनिक सुविधांचा पुरेपूर वापर करत परिसराची स्वच्छता व प्लास्टीक मुक्तीची अंमलबजावणी करावी, असे आवाहन जि.प. सीईओ संजिता मोहपात्रा यांनी केले आहे.जिल्हयात दरवर्षीप्रमाणे स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण या क्रमात प्रत्येक ग्रामपंचायत सहभागी होत असते. केंद्रशासनाच्यावतीने प्रत्येक प्रा. पं. ची अद्ययावत माहिती घेऊन उभारण्यात आलेल्या




घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या सुविधांची चाचणी व तपासणी करण्यासाठी हे पथक जिल्ह्यात दाखल झाले आहे. प्रत्येक ग्रा. पं. ची तपासणी एकूण १ हजार गुणांपैकी प्राप्त झालेल्या गुणांकनाच्या आधारे जिल्ह्याचे गुणांकन ठरणार आहे.

त्याचप्रमाणे राज्याचेदेखील गुणांकन देशपातळीवर ठरणार असल्याने प्रत्येक गावाने आपापल्या सुविधांचा वापर नियमित करण्याचे आवाहन सीईओ मोहपात्रा यांनी केले आहे या पाहणीदरम्यान प्लॉस्टिक संकलन व व्यवस्थापन म्हणजेच वर्गीकरण केंद्राची पाहणी, खत बहुधांचे व्यवस्थापन, परिसर स्वच्छता तसेच गृहभेटीतूनमिळणारी माहिती इत्यादीबाबत गुणांकन होणार आहे.घनकचरा सांडपाणी व्यवस्थापनाच्या सुविधाबाबत थेट निरीक्षणासाठी १२० गुण आहेत. ग्रामस्थांचा प्रतिसादांसाठी १०० गुण. गावातील सुविधांचा वापराबाबत २४० गुण तर प्रत्यक्ष पाहणी व निरीक्षणदरम्यान ५४० गुणांची प्रश्नावली असणार आहे. असे एकूण १ हजार गुणांपैकी प्राप्त होणाऱ्या गुणांच्या आधारे देशातील व महाराष्ट्रातील सर्वात स्वच्छ सुंदर गाव व ग्रामपंचायत या मोहिमेदरम्यान घोषित होणार आहे. गाव भेटीदरम्यान प्रत्यक्ष निरीक्षण करताना स्वच्छता सुविधांचे निरीक्षण, ग्रामस्थांचा सहभाग जनजागृती दृश्यमान स्वच्छता इत्यादीबाबत पाहणी होणार आहे.

# घरकुल लाभार्थ्यांना निकृष्ट दर्जाची रेती काँग्रेसची तक्रार ; तहसीलदारांना दिले निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मोर्शी**

शासन धोरणानुसार पंतप्रधान आवास योजनेंतर्गत मंजूर घरकुल लाभार्थ्यांना निकृष्ट दर्जाची रेती न देता घरकुल बांधकामाकरिता उत्कृष्ट दर्जाची रेती उपलब्ध करून देण्यात यावी, अशा आशयाचे निवेदन मोर्शी शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भूषण कोकाटे यांच्या नेतृत्वात तहसीलदार विनोद वानखडे यांना देण्यात आले.

पंतप्रधान आवास योजनेमधील मंजूर घरकुल लाभार्थ्यांना महसूल विभागातर्फे १ ब्रास मोफत रेती देण्याचा नुकताच शासननिर्णय झाला असून त्याअंतर्गत मोर्शी शहरातील घरकुल लाभार्थ्यांनसुद्धा मोफत रेती उपलब्ध करून दिल्या जात आहे, परंतु ती रेती निकृष्ट दर्जाची असून भसवा, मातीमिश्रित असून



बांधकामाच्या कुठल्याही उपयोगी पडत नसल्यामुळे घरकुल लाभार्थी मोफत मिळत असलेली रेती घेण्यास टाळाटाळ करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.विशेष बाब म्हणजे ही रेती घरकुल लाभार्थ्यांना स्वखर्चाने रेतीघाटावरून स्वतःच आणावी लागत असल्यामुळे ती रेतीने-आण करण्यासाठी लागणारा खर्चसुध्दा न परवडणारा असून त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे.सदर बाबीची मोर्शी शहर काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष भूषण कोका यांनी तत्काळ दखल घेऊन घरकुल लाभार्थ्यांना सोबत घेऊन सदर प्रकार तहसीलदार विनोद वानखडे यांच्या लक्षात आणून दिला. वरील बाब ही गंभीर स्वरूपाची असून घरकुल लाभार्थ्यांना उत्कृष्ट दर्जाची रेती उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. याप्रसंगी राजाभाऊ साठवणे, कृष्णा वाघमारे, घरकुल लाभार्थी अनिल मेश्राम, अब्दुल आमिर अब्दुल लतीफ उपस्थित होते.

# दर्यापुर बसस्थानकाचा गलथान कारभार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५दर्यापूर**

एस.टी. महामंडळाच्या बसचालकांच्या मनमानीपणामुळे शहरातील वाहतूक विस्कळीत होत असताना दिसत आहे. कुठल्याही आगाराची बस बसस्थानकामध्ये प्रवेश करताना मध्येच बस थांबून ओळखीच्या प्रवाशांना उतरून देण्यासाठी भर रस्त्यावर बस थांबवत असल्याने शहरात वाहतूक व्यवस्था कोलमडली जात आहे.हा प्रकार गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. चालकांच्या मनमानीपणामुळे इतर वाहनधारकांना त्याचा मोठ्या प्रमाणावर मनस्ताप सहन करावा लागतो बस स्थानकात गेल्यानंतर प्रवासी उतरविणे क्रमप्राप्त असताना



वर्दळीच्या ठिकाणी बसचालक बस थांबून ओळखीचे जवळचे प्रवासी उतरवतात. या कारणामुळे शहरात अपघाताची शक्यता नाकारता येत नसून आगार व्यवस्थापकाने याकडे लक्ष केंद्रित करणे गरजेचे बनले आहे.

# मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मदाय कक्षाची जिल्हाधिकारी कार्यालयात सुरुवात

## कक्षाचे वैद्यकीय अधिकाऱ्यांसह चमूने घेतली आ. प्रताप अडसड यांची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५चांदूर रेल्वे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून राज्यभरातील अनेक गरजू नागरिकांना उपचारासाठी मोठी मदत होत आहे.मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधी कक्ष



जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे नव्याने सुरु झाला असून या कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. श्याम गावंडे, समाजसेवा अधीक्षक पवन गुल्हाने, कक्ष सदस्य मंगेश बांबटकर, प्राविण्य देशमुख यांनी आ. प्रताप अडसड यांची भेट घेतली.यावेळी गरजू लोकांना लाभकसा मिळवून देता येईल, याबाबत चर्चा झाली. या कक्षामुळे आता मतदारसंघातील, अमरावती जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांना मुंबईला न जाता येथेच या कक्षाच्च्या माध्यमातूनच मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधी मिळण्यासाठीचा अर्ज सादर करता येणार असून या बाबतीत काही तक्रारी व मदत लागल्यास सहजतेने त्यांना भेटता येणार आहे.साहाय्यता निधीचा लाभघेण्यासाठी अर्ज तथा आवश्यक माहितीसाठी संपर्क साधण्याचे आवाहन चांदूररेल्वे येथील माणुसकी संस्थेचे अध्यक्ष प्राविण्य देशमुख यांनी केले.

# मनपा शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप : तुषार भारतीय मित्र मंडळाचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

शैक्षणिक सत्र २०२५-२६ ची सुरुवात २४ जूनपासून झाली आहे. या पार्श्वभूमीवर, अमरावती मनपा क्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांना मनपाच्या शाळा विभागाद्वारे संचालित शाळांमधून दर्जेदार आणि उत्कृष्ट शिक्षण मिळेल, असा विश्वास माजी स्थायी समिती सभापती तथा माजी नगरसेवक तुषार भारतीय यांनी व्यक्त केला. बुधवार, २५ जून रोजी साईनगर परिसरातील अकोली येथील उच्च प्राथमिक शाळेत गरजू शालेय विद्यार्थ्यांना तुषार भारतीय मित्र मंडळाद्वारे दप्तर , वही पेन , पेन्सिल इ शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले तसेच उपस्थित विध्यार्थींनि अल्पोपहार आस्वाद घेतला .यावेळी आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून तुषार भारतीय म्हणाले की, एकीकडे सीबीएसई तसेच खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या युगातही आजही आपल्या मनपा शाळांमध्ये मुले शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांना उत्तम शिक्षण मिळावे, ही आपली जबाबदारी आहे. तसेच, आगामी काळात शाळेच्या विकासावर आणि मूलभूत सुविधांवर विशेष लक्ष दिले जाईल. यासोबतच, त्यांनी विद्यार्थ्यांना आगामी शैक्षणिक सत्रासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमात उपस्थित माजी महापौर चेतन गावंडे म्हणाले की, शालेय विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. माझ्या महापौर कार्यकाळात मनपा शाळांना डिजिटल बनवण्याचा आम्ही जो प्रयत्न केला होता, त्याचा येथे अकोलीच्या शाळेत उपयोग होताना पाहून आनंद होत आहे.यावेळी प्रशांत शेगोकार, विजय धामोरीकर, अनिल नंदनवार, निलेश वानखेडे, मंदार नानोटी, श्रीलेश खांडेकर,रवी वानखडे,योगेश वानखडे,हर्षा तायडे,भावना पवार,प्रियंका जसवंते,आरती शेंडे,मोहित गेडाम इत्यादी नागरिक उपस्थित होते.



# शिवभोजन थाळीचे सहा महिन्यांपासून अनुदान थकले; केंद्र चालविणे झाले कठीण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

तत्कालीन मुख्यामंत्री उद्धव ठाकरे यांनी गरिबांसाठी अल्प दरात शिवभोजन थाळी सुरु केली होती. हि योजना आजही सुरु आहे. मात्र राज्यभरातील शिव भोजन थाळी संचालकांना मागील सहा महिन्यांपासून अनुदान मिळालेले नाही. जवळजवळ शंभर ते सव्वाशे कोटी रुपये थकलेले असल्याचे सांगण्यात येत असून अनुदान न मिळाल्यामुळे शिवभोजन थाळी संचालक अडचणी सापडले आहेत.

आजच्या महागाईत गरिब मजूर, कामगारांना कमी दरात भोजन मिळावं, यासाठी १० रुपयात भोजन देण्याची योजना उद्धव ठाकरे सरकारच्या काळात सुरु करण्यात आली होती. हि योजना पुढे महायुती सरकारच्या काळात देखील सुरु ठेवण्यात आली आहे. अर्थात यासाठी ठिकठिकाणी सुरु करण्यात आलेला शिवभोजन थाळी केंद्र चालकांना सरकारकडून अनुदान स्वरूपात रक्कम दिली जात होती. मात्र आता हि अनुदानाची रक्कम केंद्र चालकांना मिळत नसल्याची चित्र आहे.




राज्यभरात जवळपास ५ हजार शिवभजन थाळी केंद्र आहेत. कोणीही उपाशी राहू नये यासाठी दहा रुपयात जेवण देण्याची योजना राज्यात राबवली जात आहे. मात्र जानेवारी महिन्यापासून केंद्र चालकांना अनुदानाची रक्कम मिळालेली नाही. अर्थात पैसे न मिळाल्यामुळे आता शिवभजन थाळी कशी चालवायची असा प्रश्न संचालकांना पडला आहे. तर शिवभोजन थाळी चालवताना कामगारांचा पगार, लागणाऱ्या अन्नधान्य असो या सगळ्या गोष्टी अडचणीच्या ठरत आहे.

दरम्यान राज्य सरकारने सुरु केलेल्या लाडकी बहीण योजनेमुळे शिवभोजन थाळीचे अनुदान रखडले का? असाही प्रश्न आता शिवभोजन चालवणारे संचालक विचारू लागले आहे. तर शहरातील काही रुग्णालयासमोर शिवभोजन थाळी ही बाहेर जाऊन येणाऱ्या रुग्णांनी रुग्णांच्या नातेवाईकांना आर्थिक भार न पडता उपयोगी ठरते. मात्र पुढच्या काळात हे चालवणे कठीण होणार असल्याचे शिवभोजन थाळीचे संचालकाने सांगितलं.

### २४ केंद्रांवर रोज २६७० थाळ्या वाटप

जिल्ह्यात एकूण २४ शिवभोजन केंद्र सुरू आहे. यामध्ये रोज २६७० थाळ्या वाटप होत आहे. यामध्ये अमरावती शहरात नऊ ठिकाणी केंद्र सुरू आहे.

# ..अखेर ‘त्या’ अल्पवयीन गर्भवती मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५धारणी :**

येथून जवळच्या जुटपाणी गावातील अल्पवयीन मुलीला फूस लावून पळविल्यावर वारंवार बलात्कार करणाऱ्या युवकाविरुद्ध धारणी पोलिसांत तक्रार दाखल झाल्याने एकच खळबळ माजलेली आहे. मुलीची गर्भधारणा झाल्यावर सरकारी दवाखान्यात भरती केल्यावर प्रकरण समोर आले. सिकलसेलची रुग्ण असल्याने तिला नागपूर रेफर करण्यात आले होते. पीडिता उपचारादरम्यान मरण पावली.

धारणी व चिखलदरा भागात बालविवाह होतच असतात,धारणीपासून १० कि.मी. अंतरावरील जुटपाणी गावातील १७ वर्षे वयाच्या एका मुलीला फूस लावून अनिल (२१) रा. जुटपाणी याने पळविले आणि वर्षभर वारंवार तिच्यावर अत्याचार केला. त्यामुळे मुलीस गर्भधारणा झाल्याने तिने उपजिल्हा रुग्णालय धारणी येथे दाखविले तेव्हा तिला गर्भधारणा झाल्याचे समजले व प्रकरण बाहेर आले. अशातच मुलीस तीव्र सिकलसेल असल्याने तत्काळ नागपूर येथे उपचारार्थ पाठविण्यात आले. मुलीच्या आईने धारणी पोलिसांत तक्रार दाखल केल्यावर वर्षभर शोषण आणि वारंवार शारिरीक उपभोगाची माहिती समोर आली.पोलिस निरीक्षक अशोक जाधव यांनी कलम ४६ (बाल लैंगिक प्रतिबंधक कायदा) तथा १३७ (२), ६४ (२) (१), ६४ (२) (एम) बीएनएस अन्वये गुन्हा कायम करण्यात आलेला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक सोळंके व हे. कॉ. वसंत चव्हाण करत आहेत. नागपूर येथे सिकलसेल आणि अप्राकृतिक गर्भधारणेचे उपचार सुरू असताना पीडिता मरण पावली. या घटनेमुळे कमी वयात लग्न किंवा भागाभागीचे प्रकरणाचा अंत अत्यंत दुर्दैवी व गंभीर होत असते, हे उजेडात आलेले आहे.

# सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांचे आगमन



सरन्यायाधीश न्या. भूषण रामकृष्ण गवई यांचे आज अमरावती विमानतळ येथे आगमन झाले. यावेळी उपस्थितांनी त्यांचे स्वागत केले. सरन्यायाधीश न्या. श्री. गवई यांच्या स्वागतासाठी खासदार बळवंत वानखडे, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, माहिती आयुक्त रवींद्र ठाकरे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, मनपा आयुक्त सौम्या शर्मा, पोलीस अधीक्षक विशाल आनंद, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र उपस्थित होते. त्यांनी विमानतळावर सरन्यायाधीश न्या. श्री. गवई यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. विभागीय आयुक्त श्रीमती सिंघल यांनी लाकडावर कोरीवकाम केलेली भारताचे संविधान उद्देशिका भेट दिली.

# बच्चू कडूंना हटवण्यामागे कॉँग्रेससोबत राज्य शासनाची छुपी युती?

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सत्तेसाठी विरोधकांची डावपेचांची मोहीम सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील सत्तांतरानंतर शेतकऱ्यांसाठी प्रभावी योजना राबविल्या जात असतानाच आता विरोधकांकडून माजी आमदार तथा बँकेचे विद्यमान अध्यक्ष बच्चू कडूंना बँकेच्या अध्यक्षपदावरून हटवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर आरोप जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अभिजीत ढेपे यांनी केला आहे. विशेष म्हणजे या हालचालींमागे राज्य शासन आणि काँग्रेसमधील छुपी युती असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.गेल्या अनेक वर्षांपासून या बँकेवर काँग्रेसची मक्तेदारी राहिली आहे ,दोन वर्षांपूर्वी बच्चू कडू यांच्या नेतृत्वात सत्तांतर झाल्यानंतर



शेतकऱ्यांसाठी अनेक लाभदायक योजना बँकेमार्फत राबवल्या गेल्या. परंतु यामुळे बँकेवरील विरोधकांची मक्तेदारी संपल्याने, त्यांच्याकडून सातत्याने कारवाया सुरू असल्याचा आरोप बँकेच्या सत्ताधाऱ्यांकडून करण्यात येत आहे.दरम्यान, विभागीय सहनिबंधकांनी नाशिक येथील न्यायालयाच्या शिक्षेचा संदर्भ देत बच्चू कडू यांना संचालक पदाकरिता अपात्र ठरवले असून, या निर्णयाविरोधात बच्चू कडू यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने त्यांना दिलासा देत विभागीय सहनिबंधकांचे आदेशावर स्थगिती दिली आहे.बच्चू कडू यांच्या माध्यमातून शेतकरी व दिव्यांग व सर्वसामान्यांच्या मागण्यांसाठी शासनावर दबाव टाकल्या जात आहे याचाच वचपा काढण्याकरिता त्यांना बँकेचे अध्यक्ष पदावरून काढण्याची प्रकार म्हणजे राज्य शासन आणि काँग्रेसचा नियोजित कट आहे, , राज्य शासनाच्या दबावाखाली घेतलेले निर्णय आहेत. काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्या हिताच्या योजनांपेक्षा बँकेवरील सत्ता अधिक महत्त्वाची वाटते, असा थेट आरोप पत्रकार परिषदेतून करण्यात आलेला आहेआमचा संघर्ष हा केवळ सत्तेसाठी नसून, शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी आहे. तो संघर्ष आम्ही शेवटपर्यंत लढणार, असा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

**अध्यक्ष बच्चू कडू यांच्या नेतृत्वात घेण्यात आलेले महत्त्वाचे निर्णय**

कर्ज वाटपामध्ये बँकेने मागील दोन वर्षांमध्ये बँकेला दिलेल्या लक्षांकाच्या एकूण १०४% पूर्तता केलेली असून सन २०२३ मध्ये रुपये ५८९ कोटी तर सन २०२४ ला ६४७ कोटीचे वाटप केलेले आहे व यावर्षी सुद्धा ६११ कोटीचे वाटप पूर्ण झाले असून सप्टेंबर २०२५ पर्यंत बँकेला ७५० कोटी कर्ज वाटपाचे लक्षांक आहेदोन वर्षाच्या काळामध्ये बँकेने शेतकरी हिताच्या व शासनाची सबसिडी असलेली एन एल एम, सौर ऊर्जा कर्ज योजना, एज्युकेशन लोन,गोडाऊन कर्ज योजना ,नेट शेड या योजना नव्याने सुरू केलेल्या आहे.

# आणिबाणीतील मानधनधारकांच्या कायम पाठीशी : जिल्हाधिकारी आशिष येरेकर

## जिल्हास्तरीय प्रदर्शनाचे उद्घाटन, सन्मानपत्राचे वितरण



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

आणिबाणीच्या घटनेला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आज कार्यकर्त्यांशी संवाद साधता आला. येत्या काळात आणिबाणीतील प्रत्येक नागरिकाशी सविस्तर चर्चा करण्यात येईल. तसेच प्रशासनाकडे काही समस्या असल्यास भेट घ्यावी. या समस्या निकाली काढण्यासाठी आणिबाणीतील मानधनधारकांच्या कायम पाठीशी असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.

यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दानेज, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपसंचालक (माहिती) अनिल आलुरकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, प्रसेनजित चव्हाण, ज्ञानेश्वर घ्यार, तहसिलदार विजय लोखंडे, प्रशांत पडघन, अधिक्षक निलेश खटके यांच्यासह आणिबाणीतील मानधनधारक उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने देशातील १९७५ ते १९७७ दरम्यान आणिबाणी काळातील छायाचित्रांचे प्रदर्शन जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनीचे उद्घाटन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांच्या हस्ते आज फित कापून करण्यात आले. तसेच जिल्हाधिकारी यांच्या हस्ते आणिबाणीतील मानधनधारकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र वितरीत करण्यात आले. आणिबाणी काळात नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर मर्यादा आल्या आणि प्रसारमाध्यमांवर सेन्सॉरशिप लादली गेली. याबाबत आवाज उठवणाऱ्या अनेक व्यक्तींना तुरुंगवास झाला. यानिमित्ताने जिल्हा प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. तसेच जिल्हाधिकारी यांच्या हस्ते आणिबाणीतील मानधनधारक यांचा सन्मान करण्यात आला. भावना जिचकार यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# कौंडण्यपूर दहीहंडीचे मुख्यमंत्र्यांना निमंत्रण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५कुऱ्हा**

कौंडण्यपूर येथील श्री रुक्मिणी मातेची पालखी दरवर्षी श्री क्षेत्र पंढरपूरला जाते. या पालखीला दहा मानाच्या पालखीत स्थान आहे. विदर्भातली ही एकमेव पालखी आहे. ही पालखी पंढरपूर येथून परत आल्यावर मोठा दहीहंडी सोहळा होतो. यंदाचा हा सोहळा ११ जुलैला होणार आहे. त्याचे निमंत्रण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले आहे.



विदर्भातील ही एकमेव मानाची पालखी १५९४ पासून संत सद्गुरू सदाराम महाराज यांनी सुरू केली. तेव्हापासून अखंडपणे ती सुरू आहे. यंदा ४३१ वर्ष पूर्ण झाले. यावर्षी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व पालखी सोहळ्यासाठी विशेष बैठक घेतली. वारकर्यांसाठी अनेक सोई सुविधा उपलब्ध करुन दिल्या श्री रुक्मिणी माता पालखी सोहळ्यात डॉक्टर, रुग्णवाहीका, पोलिस सुरक्षा व मुक्कामाच्या ठिकाणी प्रशासनाच्या माध्यमातून योग्य नियोजन करून दिले. श्री रुक्मिणी माता पालखी सोहळा प्रमुख व श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान श्री क्षेत्र कौंडण्यपूरचे सचिव सदानंद साधू यांनी नुकतीच मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन वारकर्यांच्या सुविधेबद्दल आभार मानले व त्यांना धन्यवाद दिले. तसेच ११ जुलै रोजी श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे होणार्या भव्य दहीहंडी उत्सवाचे निमंत्रण दिले.

# मेळघाटात वरुणराजाचा दुष्काळ! १२९ गावांची तहान टँकर-विहिरींवर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती :**

गत मे महिन्यात अवकाळी पावसाने जिल्ह्यात हाहाकार निर्माण केला होता. त्यानंतर आता निम्मा जून महिनाही संपत आला आहे. असे असताना वरुणराजा मात्र अद्यापही बरसला नाही. परिणामी, जिल्ह्यातील मेळघाटासह गैर आदिवासी भागातील १० हजारांवर नागरिकांना २० टँकर व १२७ विहिरी आणि बोअरवेल अधिग्रहणाद्वारे पाणीपुरवठा करून १२९ गावांची तहान भागविली जात आहे.

> पाणीटंचाई आराखड्यातील नियोजनानुसार ज्या गावात सध्याही पाणीटंचाईची समस्या आहे, अशा दहा गावांत टँकरने तर १०९ गावांत विहीर व बोअरवेल अधिग्रहित करून पाणीपुरवठा केला जात आहे.
>
> **– सुनील जाधव, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग.**

पावसाळा सुरू झाला आहे. मात्र, अद्याप जोरदार पावसाने हजेरी लावली नाही. परिणामी, ग्रामीण भागात टँकर आणि विहीर अधिग्रहणाची संख्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्ह्यात पाणीटंचाईवर मात करण्यासाठी कृती आराखडा मंजूर केला आहे. यामध्ये जून महिन्यापर्यंतचे नियोजन केले आहे. मात्र, दरवर्षी जून महिन्यात पावसाला सुरुवात होते. पाणीटंचाई निवारणाचे काम वरुणराजा करतो. यंदा जिल्ह्यात उन्हाचा तडाखाही चांगला वाढला आहे. अद्यापपर्यंतही जोरदार पावसाने हजेरी लावली नाही. अशा ठिकाणी पिण्याच्या पाण्याची स्थिती बिकट झाली आहे. पाऊस लवकर पडला तर टँकर, बोअरवेल अन् विहिरी अधिग्रहण पाणीपुरवठ्यातून नागरिकांचीही सुटका होणार आहे. पाऊस पडत असला तरी कुठे पडतो, तर कुठे काहीच नाही. त्यामुळे पाणीटंचाईची स्थिती जोरदार पाऊस पडेपर्यंत सुधारणार नाही.

**चिखलदऱ्यातील १० गावांत टँकरने पाणी**

मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील आकी, खडीमल, मोथा, लवादा, शहापूर, तारुबांदा, गौलखेडा बाजार, मेहरीअम, बहादरपूर, धरमडोह, गवळीढाणा, आलाडोह, खिरपाणी आदी १० गावांत २० टँकरने नागरिकांना पाणीपुरवठा केला जात आहे.

**४३ बोअरवेल, ८४ विहिरींचे अधिग्रहण**

पाणीटंचाई निवारणार्थ प्रश्न सोडविण्यासाठी १०९ गावांत विहिरी, ४३ बोअरवेल आणि ८४ खासगी विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. या ठिकाणांहून वस्त्यांमध्ये पाणीपुरवठा केला जात आहे. यामधून पाणीटंचाईची समस्या निवारण केले जात आहे.